# कृषि पणन विषयक बातम्या : जानेवारी 2025

नाशिक गुरूवार, दि.३० जानेवारी २०२५ भ्रमर

## महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचा उद्यापासून मिलेट महोत्सव

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' या संकल्पनेअंतर्गत विविध महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. कृषि पणन मंडळाच्या विभागीय कार्यालय नाशिक मार्फत 'मिलेट महोत्सव-२०२५'चे आयोजन उदाजी महाराज शैक्षणिक वारसा संग्रहालय, के.बी.टी. इंजिनिअरींग कॉलेज जवळ, गंगापूर रोड, नाशिक येथे दि.३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती कृषि पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक एस.वाय.पुरी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या संदर्भात अधिक माहिती देताना पुरी यांनी सांगितले की, संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०२३ हे वर्ष



म्हणून साजरे केले. या निमित्ताने देशभर विविध उपक्रम राबविण्यात आले. गतवर्षी सुध्दा नाशिक विभागीय कार्यालयामार्फत दि. १ ते ३ मार्च २०२४ या कालावधीत मिलेटस् महोत्सव आयोजित करण्यात आला होता. त्यास ग्राहकांकडून भरपूर प्रतिसाद मिळाला. तसेच महाराष्ट्र राज्यामध्ये ''महाराष्ट्र श्री अन्न (मिलेट) अभियान'' सुरु करण्यात आले असून त्याअनुषंगाने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. विशेष म्हणजे तृणधान्य वर्षाची सांगता झालेली असली तरी, उत्पादक

आरोग्याच्या दृष्टिकोनातून फायदेशीर आहे.

या मिलेट महोत्सवात ३० मिलेटस्चे स्टॉलस् मिलेट खाद्यपदार्थांचे ५ स्टॉल उभारण्यात येणार आहेत. नाशिकरांनी मिलेटस् महोत्सवास भेट देऊन स्टॉल धारकांचा उत्साह वाढवावा तसेच विविध कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन कृषि पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक एस.वाय. पुरी यांनी केले आहे. यावेळी पत्रकार परिषदेस महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचे विभागीय व्यवस्थापक बी.सी. देशमुख व अन्य अधिकारी उपस्थित होते.

महोत्सवामध्ये राज्याच्या विविध भागातून तृणधान्य उत्पादक, प्रक्रियामध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्ट अप

सदर उत्पादकांना सुमारे ३५ स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार असून ग्राहकांना अस्सल ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्रा ही तृणधान्ये व यापासून तयार करण्यात येणारा ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, रागीचा डोसा मिक्स इत्यादी नाविण्यपूर्ण अशी असंख्य उत्पादने थेट उत्पादकांकडून विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत. याबरोबरच मिलेट उत्पादन, मुल्यवर्धीत प्रक्रिया उत्पादने, आरोग्यविषयक महत्त्व या विषयी नामांकित तज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्याने, खरेदीदार-विक्रेते चर्चासत्र असे भरगच्च कार्यक्रम असणार आहेत. त्याशिवाय मिलेटस् गुलाबजाम व मिलेटस् आईसक्रीम हे या महोत्सवाचे

Scanned with OKEN Scanner

Sakal, 30/01/2025

# कृषी पणन मंडळाचा उद्यापासून 'मिलेट महोत्सव'

**नाशिक :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत दरवर्षी उत्पादक ते ग्राहक थेट विक्री या संकल्पनेअंतर्गत विविध महोत्सवांचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार पणन मंडळाच्या नाशिक विभागीय कार्यालयामार्फत 'मिलेट महोत्सव - २०२५'चे आयोजन ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत उदाजी महाराज शैक्षणिक वारसा संग्रहालय, के.बी. टी.इंजिनीअरिंग कॉलेजजवळ, गंगापूर रोड, नाशिक येथे करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्यात 'महाराष्ट्र श्री अन्नअभियान' सुरू करण्यात आले असून त्याअनुषंगाने पणन मंडळामार्फत पुण्यात ८ ते १२ जानेवारी दरम्यान झालेल्या मिलेट्स महोत्सवावेळी पणन मंत्री जयकुमार रावल यांनी कृषी पणन मंडळाच्या सर्व विभागीय कार्यालयामार्फत कार्यकारी संचालक आणि सरव्यवस्थापक यांच्या मार्गदर्शनाखाली विभागीय स्तरावर मिलेट्स महोत्सवाचे आयोजन करण्याचे सुचविले होते. त्यानुसार हा महोत्सव नाशिकमध्ये होत आहे. महोत्सवात राज्याच्या विविध भागांतून तृणधान्य उत्पादक, प्रक्रियामध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्ट अप कंपन्या सहभागी होणार आहेत. उत्पादकांना सुमारे ३५ स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मिलेट उत्पादन, मूल्यवर्धित प्रक्रिया उत्पादने, आरोग्यविषयक महत्त्व या विषयी नामांकित तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने, खरेदीदार-विक्रेते चर्चासत्र असे कार्यक्रम असणार आहे, असे पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक एस. वाय. पुरी यांनी सांगितले.

Agrowon, 29/01/2025

# आंतरराष्ट्रीय फुलबाजारासाठी 'डीएफआर'चे घेणार मार्गदर्शन

## उत्पादन ते निर्यात एकाच ठिकाणी ; ऑनलाइन खरेदी विक्री होणार

गणेश कोरे : अॅग्रोवन वृत्तसेवा

पुणे : निर्यातक्षम फूल उत्पादनासाठीचे क्लस्टर विकसित झालेल्या तळेगाव दाभाडे (जि. पुणे) येथे पणन मंडळाच्या वतीने सुमारे १०० कोटी रुपये खर्चून आंतरराष्ट्रीय फुलबाजार उभारण्यात येत आहे. या फुलबाजाराचा अंतिम आराखडा तयार झाला असून, उत्पादन ते निर्यातीसाठी पुष्पसंशोधन संचालनालयाचे मार्गदर्शन घेतले जाणार आहे. हा अंतिम आराखडा लवकरच भारतीय कृषी संशोधन परिषदेला (आयसीएआर) सादर केला जाणार असल्याचे पणन मंडळातील सूत्रांनी सांगितले.

शेतीला उद्योगाचा दर्जा प्राप्त व्हावा आणि याद्वारे शेतकरी निर्यातदार व्हावा या



उद्देशाने पणन मंडळाने काही वर्षांपूर्वी तळेगाव दाभाडे (ता. मावळ) येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने फ्लोरिकल्चर पार्क उभारले आहे. या पार्क प्रमाणेच मावळ तालुक्यात मोठ्या प्रमाणावर शेतकरी पॉलिहाउसच्या माध्यमातून निर्यातक्षम फुलांचे उत्पादन घेत आहे.

या पार्कमधून आणि मावळ तालुक्यातून 'व्हॅलेंटाइन डे'साठी वर्षभरातून लाखो गुलाब फुलांची निर्यात होते. मात्र फ्लोरिकल्चर पार्कमध्येच आंतरराष्ट्रीय फुल बाजार उभारण्याची मागणी पार्कमधील शेतकरी अनेक वर्षांपासून करत होते. यानुसार पणन मंडळाने पुढाकार घेत, मंडळाच्या राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेमध्ये आंतरराष्ट्रीय फुलबाजार उभारण्याचा निर्णय घेतला आहे.

या बाबत पणन मंडळाने भारतीय कृषी संशोधन परिषदेला (आयसीएआर) समन्वय साधत सविस्तर प्रकल्प आराखडा करण्याचे हाती घेतले आहे. प्रकल्प आराखड्यात विविध तज्ज्ञांसोबत सल्लामसलत करून, आराखडा अंतिम टप्प्यात आला असून, तो पुढील ८ दिवसांत अंतिम मान्यतेसाठी 'आयसीएआर'ला सादर करण्यात येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

### 'डीएफआर'चे मार्गदर्शन मोलाचे

पुष्पसंशोधनासाठी देशपातळीवरील संशोधन संस्था मांजरी (ता. हवेली) येथे कार्यरत आहे. या संस्थेच्या वतीने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध फुलांची मागणी ध्यानात घेऊन, नवनवीन वाणांचे संशोधन केले जात आहे. यामुळे संस्थेचे मोलाचे मार्गदर्शन आंतरराष्ट्रीय फुलबाजार उभारण्यासाठी होणार आहे.

### फ्लोरिकल्चर एक्सलन्स सेंटर

डच तंत्रज्ञानाने फ्लोरिकल्चर एक्सलन्स सेंटर देखील राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेमध्ये उभारण्यात आले आहे. यामुळे फुलशेतीमधील आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान शेतकऱ्यांना एकाच ठिकाणी उपलब्ध होत आहे. तंत्रज्ञान आणि आंतरराष्ट्रीय व्यापार एकाच ठिकाणी उपलब्ध होणार असल्याचे फूल निर्यातीचे हब या ठिकाणी विकसित होत आहे.

Agrowon, 28/01/2025

# आठ हजार टनांवर राज्यातून द्राक्ष निर्यात

अभिजित डाके : ॲग्रोवन वृत्तसेवा

**सांगली : यंदाच्या हंगामातील द्राक्ष निर्यात सुरू झाली असून, युरोपियन आणि आखाती देशात ५५३ कंटनेरमधून ८ हजार ३०९ टन द्राक्षांची निर्यात झाली आहे. द्राक्ष निर्यातीस शेतकरी पुढे येत असल्याची माहिती कृषी विभागाने दिली.**

यंदा द्राक्ष हंगामाला निसर्गाचा सतत अडथळा आला होता. त्यातच निर्यातक्षम द्राक्ष बागांच्या फळ छाटण्या सप्टेंबर, ऑक्टोबरच्या दरम्यान, होतात. मात्र या दरम्यान, अवकाळी पावसामुळे फळ छाटणीला विलंब झाला. त्यामुळे हंगाम लांबणीवर गेला. तरीही शेतकऱ्यांनी नेटके व्यवस्थापन करत बागा साधल्या. राज्यातून द्राक्ष निर्यात करण्यासाठी आजअखेर ४१ हजार ८२१ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे.

पान ४ वर »



**द्राक्ष निर्यात दृष्टिक्षेप**

| देश | कंटनेर | टन |
|---|---|---|
| युरोपियन | ९८ | ११४५ |
| आखाती | ४५५ | ७१६४ |
| एकूण | ५५३ | ८३०९ |

"निर्यातक्षम द्राक्ष बागांना अवकाळी पावसाचा फटका बसल्याने हंगाम उशिरा सुरू झाला आहे. अशा परिस्थितीत दर्जेदार द्राक्ष उत्पादनाचे आव्हान होते. त्यातूनही गुणवत्तापूर्ण द्राक्ष उत्पादन घेण्यासाठी काटेकोर नियोजन केल्याने शक्य झाले.

- अमित गुरव, निर्यातक्षम द्राक्ष उत्पादक शेतकरी, पळशी, ता. खानापूर, जि. सांगली

## आठ हजार टनांवर राज्यातून द्राक्ष निर्यात

» पान १ वरून

राज्यातून दर वर्षी आखाती देशात डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून तर युरोपियन देशात जानेवारीच्या पहिल्या आठवड्यातून निर्यातीचा प्रारंभ होतो. त्यानुसार द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांकडून फळ छाटणीचे नियोजन केले जाते. परंतु सप्टेंबर, ऑक्टोबरमध्ये फळ छाटणी वेळी आणि नंतर निसर्गचा अडथळा आला. हंगाम उशिरा सुरू झाल्याने यंदा द्राक्ष निर्यातीस आठ ते दहा दिवस विलंब झाला.

या वर्षी आखाती देशात द्राक्ष निर्यातीला डिसेंबरच्या मध्यापासून सुरुवात झाली आहे. तर युरोपिनय देशात निर्यात सुरू होऊन पंधरा दिवसांचा कालावधी झाला आहे. या कालावधीत राज्यातून ५५३ कंटनेरमधून ८ हजार ३०९ टन द्राक्षांची निर्यात झाली आहे. द्राक्ष निर्यातीस फारशी गती आली नाही.

सध्या द्राक्ष हंगामास पोषक वातावरण आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. अनेक भागांत फेब्रुवारीपासून निर्यातीला गती येईल. राज्यात गत वर्षी द्राक्ष निर्यातीसाठी ४४ हजार २२० शेतकऱ्यांनी नोंदणी केली होती. जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात ७ हजार ९१८ टन द्राक्षांची निर्यात झाली होती.

**नोंदणीसाठी दोन वेळा मुदतवाढ**

नैसर्गिक आपत्तीच्या संकटामुळे फळ छाटणीचे वेळापत्रक शेतकऱ्यांना बदलावे लागले. त्यामुळे शेतकऱ्यांनी नोंदणीची मुदत वाढवावी अशी मागणी केली. त्यानुसार दोन वेळा मुदत वाढवली असून निर्यात करण्याऱ्या शेतकऱ्यांची संख्येत वाढ होऊन निर्यातही वाढण्याचा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे.

पुण्य नगरी

# फळ व फूल पिकांच्या मूल्यवर्धनासाठी जागतिक दर्जाची व्यापार कौशल्ये वापरावीत

## पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांचे निर्देश

**मुंबई :** राज्यातील फळ व फुले पिकांच्या मूल्यवर्धनासाठी मॅग्नेट प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा आहे. त्या माध्यमातून जागतिक दर्जाची व्यापार कौशल्ये वापरून राज्यातील फळे आणि फुले पिकांना जगाच्या बाजारपेठेत भाव मिळवून देण्याचे निर्देश पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी दिले.

आशियाई विकास बँक अर्थसहायित महाराष्ट्र ॲग्रीबिझिनेस नेटवर्क प्रकल्पाची आढावा बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे झाली. या बैठकीस आशियाई विकास बँकेचे संचालक टाकेशी उएडा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, मॅग्नेट प्रकल्प संचालक विनायक कोकरे, अतिरिक्त प्रकल्प संचालक अमोल यादव, पणन



विभागाचे उपसचिव संतोष देशमुख तसेच विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पणनमंत्री रावल म्हणाले, प्रमुख १४ फळपिके आणि सर्व प्रकारची फूल पिकांचे उत्पादन ते ग्राहकांपर्यंत वितरण होण्यासाठी समाजमाध्यमांच्या वापराबरोबरच स्थानिक भाषेचा उपयोग करून प्रसिद्धी करावी. तसेच याकामी कृषी स्नातक महाविद्यालयाबरोबरच विद्यार्थ्यांचा मार्केटिंगसाठी सहभाग करून घेण्यात यावा. तसेच निर्यात करताना प्लास्टिकचा वापर न करता जैव विघटनशील साहित्याचा वापर करावा, असे निर्देशही रावल यांनी दिले.

फलोत्पादन पिकांच्या व फुलांच्या मूल्य साखळीत खासगी गुंतवणूक आकर्षित करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले पाहिजे, असे सांगून रावल म्हणाले की, फळे आणि भाजीपाल्यांचे नुकसान कमी होणे आणि साठवणूक क्षमता वाढवणे गरजेचे आहे. मॅग्नेट प्रकल्पाचे उद्देश साध्य करण्यासाठी उत्पादक तसेच उद्योजकांना संघटित बाजारपेठेत प्रवेश मिळवून देण्यासाठी आवश्यक तांत्रिक सहाय्य, पायाभूत सुविधा उभारणीसाठी सहाय्य, मध्यम मुदत कर्ज आणि खेळते भांडवल पुरवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. पणन मंत्री रावल म्हणाले की, उत्तम कृषी पद्धतीत पीक उत्पादन क्षेत्रामध्ये महिलांना मोठ्या प्रमाणात प्रशिक्षण देण्यात यावे. केळीच्या खोडापासून ॲक्टिव्हेटेड कार्बन आणि बायोचारसंदर्भात कार्यवाही करण्यात यावी. राज्यातील प्रमुख फळपिकांच्या निर्यातीसाठी नवीन बाजारपेठा शोधण्यासाठी तज्ज्ञांचे सहकार्य घ्यावे, अशाही सूचना या वेळी रावल यांनी केल्या.

मॅग्नेट प्रकल्पाबाबत रावल म्हणाले की, या प्रकल्पासाठी ११०० कोटी रुपयांची तरतूद असून, हा प्रकल्प राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये ६ वर्षांसाठी सन २०२१- २२ ते २०२७-२८ पर्यंत राबवला जाईल. याबाबत आशियाई विकास बँक, केंद्र व राज्य शासन यांच्यामध्ये करार झाला असून, यामुळे पिकांची गुणवत्ता व अन्न सुरक्षितता मानकाच्या अवलंबामुळे लाभार्थी शेतकऱ्यांना १० टक्के वाढीव किंमत मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

Pune Edition
Jan 23, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# जागतिक दर्जाचे मार्केटिंग कौशल्य वापरा

- पणनमंत्री जयकुमार रावल
- मॅग्नेट प्रकल्पाच्या बैठकीत फळे, फुलांच्या मूल्यवर्धनासाठी दिल्या सूचना



मॅग्नेट प्रकल्पाच्या बैठकीत बोलताना पणनमंत्री जयकुमार रावल व उपस्थित मान्यवर.

पुणे : पुढारी वृत्तसेवा

राज्यातील फळ व फुलपिकांच्या मूल्यवर्धनासाठी महाराष्ट्र ॲग्रिबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा आहे. त्या माध्यमातून जागतिक दर्जाचे मार्केटिंग कौशल्य वापरून राज्यातील फळ आणि फुलपिकांना जगाच्या बाजारपेठेत भाव मिळवून देता येईल. प्रमुख १४ फळपिके आणि सर्व प्रकारच्या फुलपिकांचे उत्पादन ते ग्राहकांपर्यंत वितरण होण्यासाठी मार्केटिंगद्वारे प्रसार करण्याच्या महत्त्वपूर्ण सूचना पणन व राजशिष्टाचारमंत्री जयकुमार रावल यांनी दिल्या.

आशियाई विकास बँक अर्थसाहाय्यित महाराष्ट्र ॲग्रिबिझनेस नेटवर्क प्रकल्पाची पणनमंत्री रावल यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि. २२) सह्याद्री अतिथिगृह येथे बैठक झाली. या बैठकीला आशियाई विकास बँकेचे संचालक टाकेशी उएडा, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, मॅग्नेट प्रकल्पाचे संचालक विनायक कोकरे, अतिरिक्त प्रकल्प संचालक अमोल यादव, पणन विभागाचे उपसचिव संतोष देशमुख तसेच विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

रावल म्हणाले, फळे व फुलपिकांच्या वितरणासाठी समाज माध्यमांच्या वापराबरोबरच स्थानिक भाषेचा उपयोग करून प्रसिद्धी करावी तसेच याकामी कृषी स्नातक महाविद्यालयाबरोबरच कृषी स्नातक विद्यार्थ्यांचा मार्केटिंगसाठी सहभाग करून घेण्यात यावा. तसेच निर्यात करताना प्लास्टिकचा वापर न करता जैव विघटनशील साहित्याचा वापर करावा. मॅग्नेट प्रकल्पासाठी ११०० कोटी रुपयांची तरतूद असून, हा प्रकल्प राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये ६ वर्षांसाठी सन २०२१-२२ ते २०२७-२८ पर्यंत राबविला जाईल. याबाबत आशियाई विकास बँक, केंद्र व राज्य शासन यांच्यामध्ये करार झाला असून, यामुळे पिकांची गुणवत्ता व अन्न सुरक्षितता मानकाच्या अवलंबामुळे लाभार्थी शेतकऱ्यांना १० टक्के वाढीव किंमत मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

फलोत्पादन पिकांच्या व फुलांच्या मूल्य साखळीत खासगी गुंतवणूक आकर्षित करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले पाहिजे, असे सांगून ते म्हणाले, फळे आणि भाजीपाल्यांचे नुकसान कमी होणे आणि साठवणूक क्षमता वाढविणे गरजेचे आहे. मॅग्नेट प्रकल्पाचे उद्देश साध्य करण्यासाठी उत्पादक तसेच उद्योजकांना संघटित बाजारपेठेत प्रवेश मिळवून देण्यासाठी आवश्यक तांत्रिक साहाय्य, पायाभूत सुविधा उभारणीसाठी साहाय्य, मध्यम मुदत कर्ज आणि खेळते भांडवल पुरविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

मंत्री रावल म्हणाले, उत्तम कृषीपद्धतीत पीक उत्पादन क्षेत्रामध्ये महिलांना मोठ्या प्रमाणात प्रशिक्षण देण्यात यावे. केळीच्या खोडापासून ॲक्टिव्हेटेड कार्बन आणि बायोचारसाठी कामकाज करावे. राज्यातील प्रमुख फळपिकांच्या निर्यातीसाठी नवीन बाजारपेठा शोधण्यासाठी तज्ज्ञांचे सहकार्य घ्यावे, अशाही सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

Pune Gramin Edition
Jan 23, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

# नारायणगावातून इराकला १५ टन केळी निर्यात

**नारायणगाव, जि. पुणे :** निर्यातक्षम द्राक्षाचे आगार म्हणून ओळख असलेल्या वारूळवाडी (ता. जुन्नर) परिसरातील शेतकऱ्यांनी आता निर्यातक्षम केळी उत्पादनात आघाडी घेतली आहे. येथील प्रगतिशील शेतकरी ऋतुपर्ण मेहेर यांनी उत्पादित केलेल्या १५ टन (१ हजार ५४० पेट्या) निर्यातक्षम केळीचा पहिला वातानुकूलित कंटेनर सोमवारी (ता. २०) सकाळी कृषी विज्ञान केंद्र नारायणगाव, डेक्कन व्हॅली फार्मर्स प्रोड्युसर, सह्याद्री फार्मर्स प्रोड्युसर कंपनी यांच्या वतीने इराक देशात निर्यातीसाठी रवाना करण्यातआला.

आमदार शरद सोनवणे, कृषी विज्ञान केंद्राचे अध्यक्ष अनिल मेहेर यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात केळी उत्पादक मोनिका मेहेर, रमा मेहेर, ऋतुपर्ण मेहेर यांच्या हस्ते कंटेनरचे पूजन करून कंटेनर रवाना केला. यावेळी डेक्कन व्हॅली फार्मर्स प्रोड्युसर कंपनीचे संचालक अजय बेल्हेकर, सनील वामन, नीलम बेल्हेकर, सह्याद्री फार्म्सचे सचिन तिडके, कृषी विज्ञान केंद्राचे राहुल घाडगे, भरत टेमकर आदी उपस्थित होते.



वारूळवाडी, ता. जुन्नर : केळीचा कंटेनर सोमवारी (ता. २०) सकाळी इराक देशात रवाना करताना आमदार शरद सोनवणे, कृषी विज्ञान केंद्राचे अध्यक्ष अनिल मेहेर व उपस्थित शेतकरी.

## शेतकऱ्यांना होतोय नफा

वारूळवाडी (ता. जुन्नर) येथील निर्यातक्षम केळी उत्पादक शेतकरी ऋतुपर्ण मेहेर यांनी १ फेब्रुवारी २०२४ रोजी पाच एकर क्षेत्रात ८ फूट बाय ५ फूट या अंतरावर जी-९ या जातीच्या केळीच्या रोपांची लागवड केली होती. यासाठी एकरी १ लाख ३५ हजार रुपये खर्च आला. १९ जानेवारी २०२५ रोजी केळीची काढणी करण्यास सुरुवात केली. एक एकर क्षेत्रात सुमारे ३४ टन केळीचे उत्पादन निघाले. त्यापैकी निर्यातक्षम केळीचे २८ टन उत्पादन निघाले. केळीला प्रति किलो सोळा रुपये भाव मिळाला. निर्यातीच्या माध्यमातून एक एकर क्षेत्रात सुमारे साडेचार लाख रुपयांचे उत्पन्न अपेक्षित आहे.

“

द्राक्ष पिकाचा वाढलेला भांडवली खर्च, नैसर्गिक समस्या याचा विचार करता शेतकऱ्यांना केळी पिकाचा पर्याय उपलब्ध झाला आहे.

- ऋतुपर्ण मेहेर,
निर्यातक्षम केळी उत्पादक शेतकरी,
वारूळवाडी, ता. जुन्नर

“

## भविष्यात भेंडी निर्यातीसाठी प्रयत्न

या वातानुकूलित कंटेनरमध्ये १५ टन (१ हजार ५४० पेट्या) केळी असून, हा कंटेनर मुंबई येथील नाव्हा शेवा बंदरातून समुद्र मार्गे पुढील आठ दिवसांत इराक देशात जाईल. आखाती देशात केळीला मागणी असल्याने या पिकापासून शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्न मिळणार आहे. जुन्नर, आंबेगाव तालुक्यांतील शेतकऱ्यांना कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून निर्यातक्षम केळी उत्पादनाबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. भविष्यकाळात भेंडी निर्यातीसाठी प्रयत्न करणार आहे.

- अनिल मेहेर,
अध्यक्ष, कृषी विज्ञान केंद्र,
नारायणगाव, ता. जुन्नर

Samana, 16/01/2025

# ‘मिलेट महोत्सवा’त ३५ लाखांची उलाढाल

पुणे, दि. १५ ( प्रतिनिधी) - महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत ८ ते १२ जानेवारी या कालावधीत स्वारगेटजवळीस गणेश कला क्रीडा रंगमंच येथे आयोजित दुसऱ्या मिलेट (तृणधान्य) महोत्सवाला पुणेकरांनी उत्तम प्रतिसाद दिला. महोत्सवाद्वारे सुमारे ३५ लाखांची उलाढाल झाली असून, यापुढील काळातही विविध महोत्सव आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.

संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून साजरे केले. या निमित्ताने देशभर विविध उपक्रम राबविण्यात आले. यामुळे मोठ्या प्रमाणात नवउद्योजक तयार झाले. त्यामुळे त्यांना विक्रीसाठी व्यासपीठ देण्यासाठी कृषी पणन मंडळामार्फत या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. महोत्सवाचे उद्‌घाटन पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते झाले. यावेळी पणन मंडळाच्या अधिकारी-कर्मचारी यांच्या मिलेट बाईक रॅलीद्वारे पुणे शहरातील प्रमुख मार्गावरून मिलेटबाबतची जनजागृती करण्यात आली. महोत्सवामध्ये राज्याच्या विविध भागांतून तृणधान्य उत्पादक, प्रक्रियामध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, नवउद्यमी (स्टार्टअप) कंपन्यांना ५० दालने (स्टॉल) उपलब्ध करून देण्यात आले होते.

ग्राहकांना अस्सल मालदांडी-दगडी ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्रा ही तृणधान्ये व त्यापासून तयार करण्यात येणारा ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली - मिक्स, रागीचा डोसा मिक्स, वरईचे दूध, वरईचे श्रीखंड, बाजरीची बर्फी अशा विविध नावीण्यपूर्ण उत्पादनांसोबतच नागपूरची संत्री व त्याचा रस थेट उत्पादकांकडून प्रदर्शन तसेच विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आला. ज्वारी, बाजरी आणि नाचणीपासून बनविलेल्या २० प्रकारच्या चवींचे आईस्क्रीम हे या महोत्सवाचे आकर्षण ठरले.

पुण्य नगरी

# कृषी पणन मंडळाच्या मिलेट महोत्सवाची सांगता

**। पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत आयोजित करण्यात आलेल्या दुसऱ्या मिलेट महोत्सवाची सांगता झाली. महोत्सवामध्ये राज्याच्या विविध भागातून तृणधान्य उत्पादक, प्रक्रियामध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्टअप कंपन्यांना ५० स्टॉल उपलब्ध करून देण्यात आले होते. ग्राहकांना अस्सल मालदांडी - दगडी ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्रा ही तृणधान्ये व यापासून तयार करण्यात येणारा ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली - मिक्स, रागीचा डोसा मिक्स, ज्वारीचे आइस्क्रीम, वरईचे दूध, वरईचे श्रीखंड, बाजरीची बर्फी अशी विविध नावीन्यपूर्ण अशी उत्पादने यासोबतच नागपूरची संत्री व त्याचा ज्यूस थेट उत्पादकांकडून प्रदर्शन तसेच विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आली.

लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत प्रत्येकाला आवडणारे आइस्क्रीम तेही ज्वारी, बाजरी आणि नाचणीपासून बनविलेले आइस्क्रीम हे महोत्सवाचे आकर्षण ठरले. २० वेगवेगळ्या चवींची (फ्लेवर) आइस्क्रीम उपलब्ध करण्यात आली. हा महोत्सव यशस्वीरीत्या पार पडणेसाठी कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी महोत्सवातील मिलेट उत्पादकांशी मिलेटच्या मार्केटिंगबाबत येत असलेल्या अडचणींबाबत चर्चा केली. महोत्सव कालावधीत मिलेट उत्पादन, मूल्यवर्धित प्रक्रिया उत्पादने, आरोग्यविषयक महत्त्व या विषयी डॉ. योगेश बन, प्रमुख अखिल भारतीय समन्वयीत नाचणी व तत्सम तृणधान्य संशोधन प्रकल्प, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, विभागीय कृषि संशोधन केंद्र, कोल्हापूर यांचे मार्गदर्शन ठेवले होते, यांस ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. नववर्षाची सुरुवात कृषी पणन मंडळाने आरोग्यपूर्ण अशा या दुसऱ्या मिलेट (तृणधान्य) महोत्सवाद्वारे केली. अशा प्रकारचे महोत्सव यापुढील कालावधीत आयोजित करुन ग्राहक व उत्पादकांकरिता संधी उपलब्ध करून देणेबाबत ग्राहकांनी मागणी केली.

महोत्सव यशस्वी करण्यासाठी संजय कदम, विनायक कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली देशांतर्गत व्यापार विकास विभागाचे मंगेश कदम, सहायक सरव्यवस्थापक सुहास काळे, सचिन माने, उमाकांत वाघ, साक्षी गायकवाड, आनंद शुक्ल यांनी परिश्रम घेतले. महोत्सवास विविध संस्थांचे पदाधिकारी, शासकीय अधिकारी, कर्मचारी, शेतकरी, पुणेकर ग्राहक अशा साधारणतः १२ ते १५ हजार व्यक्तींनी समक्ष भेट दिली. सुमारे ३५ लाखांची उलाढाल झाली असल्याची माहिती कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.

Pune Edition
Jan 15, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भिड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# ‘पणन’च्या मिलेट महोत्सवात ३५ लाखांची उलाढाल

## पुणेकर ग्राहकांचा मिळतोय उत्तम प्रतिसाद

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्य कृषी पणन मंडळाच्या मिलेट (तृणधान्य) महोत्सवाला पुणेकर ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला असून, पाच दिवसांमध्ये सुमारे ३५ लाख रुपयांची उलाढाल झाली. यापुढील काळातही राज्यात विविध महोत्सव आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.

**कार्यकारी संचालक संजय कदम यांची माहिती**

ज्वारी, बाजरी आणि नाचणीपासून बनविलेल्या २० प्रकारच्या चवींचे आईस्क्रीम हे या महोत्सवाचे आकर्षण ठरले. महोत्सवास विविध क्षेत्रांतील साधारणत: १२ ते १५ हजार व्यक्तींनी भेटी देऊन तृणधान्यांची उत्पादने खरेदी केली. पणन मंडळामार्फत ८ ते १२ जानेवारी रोजी येथील श्री गणेश कला क्रीडा मंच येथे दुसरा मिलेट महोत्सव-२०२५ आयोजित करण्यात आला होता. महोत्सवामध्ये राज्याच्या विविध भागांतून तृणधान्य उत्पादक, प्रक्रियेमध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, नवउद्यमी (स्टार्टअप) कंपन्यांना ५० दालने (स्टॉल) उपलब्ध करून देण्यात आले होते. शेतकऱ्यांना यानिमित्त खरेदीदार ग्राहकांशी थेट संवाद व मालविक्रीचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी पणन मंडळामार्फत या महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असल्याचे कदम यांनी सांगितले.

या महोत्सवात पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी महोत्सवातील मिलेट उत्पादकांशी मिलेटच्या विक्री व्यवस्थेबाबतच्या (मार्केटिंग) अडचणींविषयी चर्चा केली. महोत्सव यशस्वी करण्यासाठी पणन मंडळाचे देशांतर्गत व्यापार विकास विभागाचे मंगेश कदम, सहायक सरव्यवस्थापक सुहास काळे, सचिन माने, उमाकांत वाघ, साक्षी गायकवाड व आनंद शुक्ल यांनी परिश्रम घेतल्याचे मंडळाने कळवले आहे.

Agrowon, 15/01/2025

# राष्ट्रीय हळद बोर्डाची स्थापना

## केंद्रीय वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांच्या हस्ते निजामाबाद येथे उद्घाटन

अॅग्रोवन वृत्तसेवा

पुणे : देशातील हळद पिकाचे गुणवत्तापूर्ण आणि अन्न सुरक्षा मानकांप्रमाणे उत्पादन करण्यासाठी तसेच निर्यातीची बाजारपेठ वाढविण्यासाठी राष्ट्रीय हळद बोर्डाची स्थापना करण्यात आली आहे. केंद्रीय वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांच्या हस्ते मंगळवारी (ता. १४) निजामाबाद येथे उद्घाटन करण्यात आले. हळदीचे मूल्यवर्धन, उद्योगांचा विकास, जागरूकता आणि प्रसार हळद बोर्डामार्फत केला जाणार आहे.

हळद बोर्ड शेतकऱ्यांच्या उत्पादन क्षमता आणि कौशल्य विकासाठी काम करणार आहे. तसेच हळदीमध्ये मूल्यवर्धन करून शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न कसे मिळेल, यासाठीही काम केले जाणार आहे. देशातील बाजारात आणि जागतिक बाजारात जास्त दर मिळावा यासाठी गुणवत्ता तसेच अन्न सुरक्षा मानकांचे पालन करण्यासाठीही काम करणार आहे.

भारतात तंबाखू बोर्ड आहे. हे बोर्ड देशातील तंबाखूची लागवड आणि व्यापारावर नियंत्रण ठेवत असते. त्याप्रमाणे हळद बोर्ड काम करेल. हळद क्षेत्राचा विकास आणि वाढ होण्यासाठी हळद उत्पादन, हळद उद्योगांचा विकास, निर्यात अशा आघाड्यावर मसाले बोर्ड आणि इतर सरकारी संस्थांसोबत काम करेल. हळदीकडे सरकारचे दुर्लक्ष असल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये आहे. सरकारी पाठबळाअभावी हळद उत्पादकांना देखील मोठा फटका बसत असतो. त्यासाठी सरकारने पुढाकार घेत हळद बोर्डाची स्थापना केली आहे.

हळद बोर्डाचे अध्यक्ष सरकारकडून निवडले जाणार आहे. या बोर्डाचे सदस्य आयुष मंत्रालय, औषधनिर्माण विभाग, कृषी मंत्रालय, वाणिज्य मंत्रालय, हळद उत्पादक राज्यांचे वरिष्ठ प्रतिनिधी, संशोधक शास्त्रज्ञ, हळद उत्पादक आणि निर्यातदारांचे प्रतिनिधी सदस्य असतील, असेही वाणिज्य मंत्रालयाकडून सांगण्यात आले. हळद बोर्ड पारंपरिक ज्ञानासोबतच नवीन उत्पादनांसाठी संशोधन आणि विकासाला प्रोत्साहन देणार आहे. जागतिक पातळीवर हळदीला औषधी गुणधर्म आणि आरोग्यासाठी पोषक म्हणून चांगली मागणी असते. हळद बोर्ड हळदीविषयी जागरूकता आणि वापर वाढीसाठी प्रयत्न करणार आहे. तसेच निर्यात वाढीसाठी नवीन बाजारपेठांचा शोध घेतला जाणार आहे, असे वाणिज्य मंत्रालयाने म्हटले आहे.

### सव्वातीन लाख हेक्टरवर हळदीचे क्षेत्र

जागतिक पातळीवर हळद बाजारात भारताची वेगळी ओळख आहे. भारत हळद उत्पादन, वापर आणि निर्यातीत जागतिक पातळीवर आघाडीवर आहे. भारतात जवळपास सव्वातीन लाख हेक्टरवर हळदीची लागवड होते. तर उत्पादन १० ते १२ लाख टनांच्या दरम्यान होते. जगातील एकूण उत्पादनापैकी जवळपास ८० टक्के उत्पादन भारतात होते. भारतातील जवळपास २० राज्यांमध्ये हळदीचे उत्पादन घेतले जाते. महाराष्ट्र, तेलंगणा, कर्नाटक आणि तमिळनाडू ही राज्ये आघाडीवर आहेत. देशात जवळपास हळदीच्या ३० वाणांची लागवड केली जाते.

### भारताकडून १.९४ लाख टन निर्यात



भारताने चालू आर्थिक वर्षात ऑक्टोबर ते नोव्हेंबर २०२४ दरम्यान जवळपास १ लाख ९४ हजार टनांची निर्यात केली. मागील वर्षी याच काळातील निर्यात १ लाख ६० हजार टन होती. बांगलादेश हा भारताच्या हळदीचा मोठा ग्राहक आहे. तसेच यूएई, अमेरिका आणि मलेशियाला जास्त निर्यात होते. सरकारला हळद निर्यातीची बाजारपेठ १०० कोटी डॉलरवर न्यायची आहे.

# देश-विदेश

Agrowon, 14/01/2025

# नवी मुंबईत महाबाजार उभारण्याचे ‘पणन’चे नियोजन

**मुंबई :** वाशीतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीला जागा अपुरी पडत असल्याने नवीन आंतरराष्ट्रीय दर्जाचा महाबाजार उभा करण्याची दांगट समितीची शिफारस राज्य सरकारने स्वीकारली आहे. पणन विभागाच्या १०० दिवस आराखडा बैठकीत पणन विभागाच्या सादरीकरणात ही माहिती देण्यात आली.

राज्यातील बाजार समित्यांचा अभ्यास करण्यासाठी, आणि बदल सुचविण्यासाठी माजी सहकार आयुक्त उमाकांत दांगट यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. बाजार समित्यांमधील प्रचलित पद्धती, नियम आणि नियमन यामध्ये मोठे बदल सुचविले होते.

वाशी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीला जागा अपुरी पडत आहे. तसेच तेथे अत्याधुनिक सुविधा उपलब्ध नाहीत त्यामुळे सरकारने जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टच्या परिसरात आंतरराष्ट्रीय दर्जाची समिती उभा करावी अशी शिफारस दांगट समितीने मागील वर्षी केली होती. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत राज्य आणि परराज्याबरोबरच परदेशातून मोठ्या प्रमाणात शेतीमालाची आवक होते. फळे, भाजीपाला आणि कांद्याची ७० टक्के आवक राज्य तसेच देशातील व्यापाऱ्यांकडून होत असते. या शेतीमालाचे विपणन झाल्यानंतर तो शहरात किरकोळ व्यापाऱ्यांकडून विकला जातो. सध्या वाशीत धान्य बाजार, मसाला, सुकामेवा, कांदा, बटाटा, लसूण, भाजीपाला, फळे अशी मार्केट आहेत. मात्र, तेथे जागा अपुरी पडत असल्याने नव्याने बाजार समिती उभा करा अशी शिफारस समितीने केली होती.

विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा यांनी नवी मुंबई येथे महाबाजार उभारण्याचे नियोजन असल्याचे सांगितले. हा बाजार आंतरराष्ट्रीय दर्जाचा असणार असून किमान दोनशे ते अडीचशे एकर जागेमध्ये हा प्रकल्प राबवण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच राज्यातील प्रत्येक तालुक्यात एक बाजार समिती उभारण्यात येणार आहे.

## मासे विक्रीसाठी स्वतंत्र व्यवस्था

कोकण भागात माशांसाठी तर आदिवासी भागात तेथील स्थानिक उत्पादनासाठी बाजार समिती स्थापन करण्यात येणार असल्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले. राज्यातील एक कोटींपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या बाजार समित्यांचे एक ते अडीच कोटी, अडीच कोटी ते पाच कोटी, पाच ते दहा कोटी, दहा ते पंचवीस कोटी असे उपावर्गीकरण करणार असल्याचीही माहिती देण्यात आली. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जाभूरगाव येथे ॲग्रो हबची उभारणी पूर्ण झाली असून येत्या ४५ दिवसांत त्याचे लोकार्पण करण्यात येणार असल्याचेही या वेळी सांगण्यात आले. बैठकीस पणन मंत्री जयकुमार रावल, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मेघना साकोरे बोर्डीकर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, पणन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

Agrowon, 14/01/2025

# सोयाबीन खरेदीसाठी कायस्वरुपी यंत्रणा उभारा

## शंभर दिवस आराखडा बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांची सूचना

**'अ‍ॅग्रो हबचा आराखडा सादर करावा'**

समृद्धी महामार्गालगत उभारण्यात येणारे अ‍ॅग्रो हब मॅग्नेट प्रकल्पाअंतर्गत उभी करावीत. या ठिकाणी सर्व सोयी सुविधा उभारण्यात याव्यात. या अ‍ॅग्रो हबसाठीचा आराखडा तयार करून सादर करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

अ‍ॅग्रोवन वृत्तसेवा

मुंबई : 'नाफेड' आणि 'एनसीसीएफ'मार्फत दरवर्षी सोयाबीनची खरेदी केली जाते. पणन विभाग यात मध्यस्थाची भूमिका बजावतो. पुढील वर्षीपासून कोणत्याही अडथळ्याशिवाय ही खरेदी व्हावी यासाठी कायमस्वरूपी यंत्रणा उभारावी, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (ता. १३) केली.

सह्याद्री अतिथिगृह येथे पणन विभागाकडून १०० दिवसांत करण्यात येणाऱ्या कामाचा आढावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतला.

समृद्धी महामार्गालगत अ‍ॅग्रो हब उभारण्यात यावेत अशी सूचनाही केली. राज्यात यंदा सोयाबीनचा बाजारातील दर पडल्याने हमीभावाने खरेदी करण्यासाठी 'नाफेड' आणि 'एनसीसीएफ'कडून खरेदी केंद्रे उभारण्यात आली. मात्र, सुरुवातीला ओलावा जास्त असल्याने खरेदीच झाली नाही. तर १५ टक्के ओलावा गृहीत धरून खरेदी करण्याचे केंद्र सरकारने आदेश दिल्यानंतरही केंद्रांनी सोयाबीन स्वीकारले नाही. ओलावा कमी झाल्यानंतर राज्यातील सोयाबीनचा बारदाना संपला.



त्यामुळे खरेदीचा पुरता बट्ट्याबोळ झाला आहे. या संपूर्ण घोळावर या बैठकीत चर्चा झाल्याचे समजते. त्यानंतर त्यांनी सूचना दिल्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, की पुढील वर्षीपासून राज्यात नोव्हेंबरमध्ये सुरू होणाऱ्या सोयाबीन खरेदीसाठीची तयारी ऑक्टोबरमध्ये पूर्ण करा. शेतकऱ्यांची नोंदणीही ऑक्टोबरमध्ये पूर्ण करावी. सोयाबीन खरेदीसाठी कायमस्वरूपी उभारण्यात येणाऱ्या व्यवस्थेचे निकष ठरवावे. त्यामध्ये सर्व सोयी सुविधांचा अंतर्भाव असावा. कोणत्याही अडचणीशिवाय सोयाबीन खरेदी सुरू राहिली पाहिजे. राज्यातील चारही विभागात उभारण्यात येणाऱ्या अ‍ॅग्रो लॉजिस्टिक हबचा प्रस्ताव सादर करावा, असेही ते म्हणाले.

कांदा साठवणुकीबाबत बोलताना ते म्हणाले, 'कांदा साठवणुकीसाठी कांदा चाळ हा उत्तम पर्याय आहे. त्यासाठी जास्त मागणी ही आहे. त्यामुळे या चाळींची संख्या वाढवावी अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

बैठकीला पणनमंत्री जयकुमार रावल, सहकार व पणन विभागाचे प्रभारी अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, सहसचिव संतोष देशमुख, पणन महासंघ, वखार महामंडळ, कापूस पणन महासंघाचे अधिकारी उपस्थित होते.

# ज्वारी, बाजरीपासून
# आइस्क्रीम

## भरड धान्यापासून २० वेगवेगळे प्रकार

Sakal, 13/01/2025

■ सागर आव्हाड

**पुणे, ता. १२ :** लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत प्रत्येकाला आइस्क्रीम आवडते. बाजारात विविध प्रकारच्या आइस्क्रीम आपण बघतो. पण सध्या बाजारात एका वेगळ्या आइस्क्रीमची चर्चा सुरू आहे ती म्हणजे ज्वारी, बाजरी आणि नागलीपासून बनविलेल्या आइस्क्रीमची.

गणेश कला क्रीडा मंच येथे राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने मिलेट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. 'एपीएल चीझ अँड क्रीम कंपनी'ने २० वेगवेगळ्या चवींची (फ्लेवर) आइस्क्रीम बनवली आहेत. यात आंबा, स्ट्रॉबेरी, व्हॅनिला, जामुन, चॉकलेट, फिल्टर कॉफी अशा प्रकारांचा समावेश आहे. ही आइस्क्रीम तमिळनाडू येथील त्रिची येथे बनवली जाते. तिची विक्री तमिळनाडू, तेलंगण, कर्नाटक आणि आता महाराष्ट्र राज्यांत केली जाते.

नितीन दिवटे म्हणाले, ''शेतकऱ्यांच्या शेतमालाला बाजारभाव मिळाला पाहिजे, यावर आम्ही अभ्यास करत होतो. आमच्या टीमने त्रिचीमध्ये सिरी या आइस्क्रीमचे संशोधन केले. त्यानंतर ही आइस्क्रीम बाजारात आणली. सध्या भरड धान्याच्या आइस्क्रीमला जो प्रतिसाद मिळत आहे, ते पाहून आम्ही रॅफल्स, पिझ्झा, तसेच मिलेट शेकदेखील बाजारात आणणार आहोत.''




## पणन मंत्र्यांकडून कौतुक...

■ पणन मंत्री जयकुमार रावल यांनी या आइस्क्रीमचा आस्वाद घेतला. ते म्हणाले, ''भरड धान्यापासून बनविण्यात आलेले अनेक पदार्थ पाहिले, पण आश्चर्य आणि आकर्षित करणारा पदार्थ म्हणजे आइस्क्रीम आहे. ही आइस्क्रीम आरोग्यदायी आहे.''

Agrowon, 12/01/2025

# चांगली बाजारपेठ देण्यासाठी काम करावे

## जयकुमार रावल : स्मार्ट प्रशिक्षण कार्यशाळा

अॅग्रोवन वृत्तसेवा



पुणे : राज्यातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतीमालाला चांगली बाजारपेठ मिळवून देण्यासाठी पणन विभागाचे अधिकारी तसेच बाजार समित्यांचे अधिकारी, कर्मचाऱ्यांनी समन्वयाने उत्कृष्ट अर्थात 'स्मार्ट' काम करावे, असे आवाहन पणनमंत्री जयकुमार रावल यांनी केले.

श्री. रावल हे यशदा येथे माननीय बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत राज्यामधील बाजार समित्यांचे अधिकारी, सचिव आणि पणन विभागाचे अधिकारी यांच्या क्षमता बांधणीसाठी आयोजित प्रशिक्षण कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी शुक्रवारी (ता. १०) बोलत होते. या वेळी राज्याचे पणन संचालक विकास रसाळ, माजी पणन संचालक सुनील पवार, यशदाचे संचालक प्रदीप गारोळे, दोंडाईचा बाजार समितीचे सभापती नारायण पाटील आणि पणन संचालनालयातील अधिकारी उपस्थित होते. या वेळी मंत्री श्री. रावल यांच्या हस्ते प्रशिक्षण प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.पणन संचालक श्री. रसाळ म्हणाले, की राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्या आणि विभागाचे अधिकारी एकत्रितपणे काम करतील. शेतकऱ्यांना स्मार्ट प्रकल्पाचा अधिकाधिक फायदा होण्यासाठी या प्रशिक्षण कार्यशाळांचा सकारात्मक फायदा होईल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक यशदाचे संचालक गारोळे यांनी केले.

### शेतीमालाच्या मूल्य साखळीमध्ये वाढ होण्यासाठी प्रयत्न करा : रावल

मंत्री श्री. म्हणाले, की महाराष्ट्र राज्य हे कृषी क्षेत्रात देशातील एक महत्त्वाचे राज्य आहे. शेतकऱ्याला शेती उत्पादन करण्याहून उत्पादित कृषिमालासाठी चांगल्या बाजारपेठेचा शोध घेऊन विक्री करणे अवघड जाते. त्यामुळे पणन विभागाने शेतीमालाच्या मूल्य साखळीमध्ये वाढ होण्यासाठी प्रयत्न करावेत. शेतीमालाची नासाडी कमीत कमी होण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कसा करता येईल यासाठी या प्रशिक्षण कार्यशाळेमधून मार्गदर्शन व्हावे.

मराठी दैनिक

# विश्वेश्वर




RNI.No. MAHMAR/2006/19129 दैनिक, पुणे, शुक्रवार १० जानेवारी २०२५ ● पाने : ६ ● किंमत ३ रुपये

# बदलत्या जीवन शैलीत तृणधान्याचे आहारात महत्वाचे स्थान, मार्केटिंग कडे लक्ष देण्याची गरज : पणन मंत्री ना. जयकुमार रावल

## पणनमंत्री ना. जयकुमार रावल यांच्याहस्ते पुण्यात मिलेट महोत्सवाचे उद्घाटन





**पुणे** : तृणधान्यांमध्ये असलेल्या पोषक तत्त्वामुळे वर्तमान युगात त्याकडे ग्राहक मोठ्या प्रमाणात आकर्षित होत असून, बदलत्या जीवनशैलीमुळे होणाऱ्या आजारांचा सामना करण्यासाठी आहारात तृणधान्याचा वापर खूप महत्त्वाचा आहे, तसेच उत्पादन विक्रीसाठी नाविण्यपूर्ण कल्पना तयार कराव्यात. शेतकऱ्यांना पॅकेजिंग, ब्रँडिंग आणि मार्केटिंगला मदत करुन त्यांच्या स्वप्नांना बळ देण्याची जबाबदारी पणन मंडळाची आहे, असे प्रतिपादन पणनमंत्री जयकुमार रावल यांनी केले. गणेश कला क्रिडा मंडळ येथे आयोजित दुसऱ्या मिलेट महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी कृषी पणन मंडळाचे संचालक विकास रसाळ, कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, सिंदखेडा बाजार समितीचे सभापती आणि मंडळाचे माजी संचालक नारायण पाटील उपस्थित होते.

मंत्री श्री. रावल म्हणाले, जगभरातील तृणधान्य लागवडीला प्रोत्साहन मिळावे या भूमिकेतून भारताने संयुक्त राष्ट्रांमध्ये २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून साजरे करावे अशी भूमिका मांडली. त्याला जवळपास ७१ देशांनी पाठिंबा दिला आणि त्यानंतर २०२३ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष' म्हणून साजरे करण्यात आले. तृणधान्याचा वापर हा एक वर्षापुरता मर्यादित न ठेवता शेतकऱ्यांनी पिकवलेल्या तृणधान्याला योग्य बाजार उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी पणन विभागाची आहे. तसेच उत्पादन विक्रीसाठी नाविण्यपूर्ण कल्पना तयार कराव्यात. शेतकऱ्यांना पॅकेजिंग, ब्रँडिंग आणि मार्केटिंगला मदत करुन त्यांच्या स्वप्नांना बळ देण्याची जबाबदारी पणन मंडळाची आहे, असेही ना.रावल म्हणाले. तृणधान्याचे महत्व लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी विविध माध्यमातून प्रचार, प्रसिध्दी करावी. तृणधान्य महोत्सव राज्यातील इतर जिल्ह्यातही घेण्यात येणार आहेत.

त्यासाठी पणन मंडळ हे उत्पादक ते ग्राहक यांना जोडणारा पूल म्हणून काम करेल असे सांगून आपल्या शेतकऱ्यांचा माल जगाच्या बाजारपेठेत पोहोचेल असा संकल्प सर्वांनी करुया असे ते म्हणाले. हा तृणधान्य महोत्सव १२ जानेवारी पर्यंत सुरु असून महोत्सवामध्ये राज्याच्या विविध भागातून तृणधान्य उत्पादक, प्रक्रियामध्ये कार्यरत असणारे बचतगट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्ट कंपन्या सहभागी झाल्या असल्याची माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी प्रास्ताविकात दिली.

सुरुवातीस पणनमंत्री श्री. रावल यांनी प्रदर्शनात लावण्यात आलेल्या स्टॉलला भेटी देऊन पाहणी केली. यावेळी मिलेट जनजागृतीसाठी काढण्यात आलेल्या बाईक रॅलीस श्री. रावल यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून सुरुवात करण्यात आली.

सामना

# जगातील मोठी बाजार समिती मुंबईत उभारणार!

पुणे, दि. ९ (प्रतिनिधी) – जगातील मोठ्या बाजारपेठांचा अभ्यास करून मुंबईजवळ एक ते दीड हजार एकर क्षेत्रावर देशातील सर्वांत मोठी बाजारपेठ उभारण्यासाठी विचार सुरू आहे. धान्य, भाजीपाला, फळांचे देशाचे हब म्हणून ही बाजार समिती असेल. या माध्यमातून राज्यासह देशातील शेतमाल जगाच्या बाजारपेठेत विकला जाईल. यामुळे शेतकऱ्यांना फायदा होईल, असा विश्वास राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाकडून आयोजित दुसऱ्या मिलेट महोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमानंतर रावल यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

ते म्हणाले, राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या मोठ्या बाजार समित्या नोडल आहेत. त्या माध्यमातून शेतकरी आणि व्यापाऱ्यांना बाजार उपलब्ध आहे. या बाजार समित्या सुरू होऊन मोठा कालखंड लोटला आहे. त्यामुळे मुंबईत विमानतळासह रेल्वे, रस्ते आदी सर्व सुविधा असलेल्या परिसरात जागतिक दर्जाची बाजारपेठ निर्माण करण्याचे नियोजन आहे. तसेच, पुणे बाजार समितीचा सुरू असलेल्या फुलबाजाराच्या कामाला गती देऊन पुण्यात फुलांचा आंतरराष्ट्रीय बाजार सुरू करण्यात येईल.

या कार्यक्रमास कृषी पणन मंडळाचे संचालक विकास रसाळ, कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, पुणे बाजार समितीचे सचिव डॉ. राजाराम धोंडकर, सिंदखेडा बाजार समितीचे सभापती आणि मंडळाचे माजी संचालक नारायण पाटील उपस्थित होते.

शेतकऱ्यांना पॅकिंग, ब्रँडिंग आणि मार्केटिंगला मदत करून त्यांच्या स्वप्नांना बळ देण्याची जबाबदारी पणन मंडळाची असल्याचेही पणनमंत्री जयकुमार रावल यांनी नमूद केले.

## सोयाबीन खरेदी लवकरच

■ सोयाबीनच्या खरेदीसंदर्भात मार्केटिंग फेडरेशन बैठकीत सोयाबीन खरेदीला वेग आला पाहिजे, याबाबत सूचना केल्या आहेत. सध्या बाजारात शेतमाल भरायचा बारदान कमी पडत आहे. त्यामुळे सोयाबीन खरेदी मंदावली आहे. पुढील दोन-चार दिवसांत बारदान उपलब्ध होईल. त्यानंतर सोयाबीन खरेदी पुन्हा वेगाने सुरू होईल. खरेदीनंतर सात ते दहा दिवसांत शेतकऱ्यांना सोयाबीनचे पैसे मिळतील, असे नियोजन केल्याचे रावल यांनी सांगितले.

Pune Edition
Jan 10, 2025 Page No. 3
Powered by: erelego.com

सकाळ

# पॅकेजिंग, ब्रँडिंग अन् मार्केटिंग महत्त्वाचे

## रावल : कृषी पणन मंडळाच्या 'मिलेट' महोत्सवाचे उद्घाटन



**गणेश कला क्रीडा मंच, स्वारगेट :** कृषी पणन मंडळाच्या स्वारगेट महोत्सवाचे उद्घाटन पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते गुरुवारी झाले. या वेळी उपस्थित मान्यवर.

मार्केट यार्ड, ता. ९ : ''आपल्याकडे पिकवणे सोपे आहे, परंतु विकणे फारच अवघड आहे. आयातीच्या चक्रात आपण स्थानिक खायचे विसरून जात आहोत. आहारात 'मिलेट'चा (तृणधान्य) वापर खूप महत्त्वाचा आहे. उत्पादन, विक्रीसाठी नावीन्यपूर्ण कल्पना तयार कराव्यात. शेतकऱ्यांना पॅकिजिंग, ब्रँडिंग आणि मार्केटिंगसाठी मदत करून जगाच्या बाजारात 'मिलेट' विकण्याची जबाबदारी पणन मंडळाची आहे,'' असे मत पणनमंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केले.

कृषी पणन मंडळाचा 'मिलेट' महोत्सवाचे उद्घाटन रावल यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. पणन संचालक विकास रसाळ, कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, बाजार समितीचे सचिव डॉ. राजाराम धोंडकर, सिंदखेड बाजार समितीचे सभापती नारायण पाटील, पणन मंडळाचे साहाय्यक सरव्यवस्थापक मंगेश कदम आणि अनिमेश पाटील उपस्थित होते. रावल यांनी प्रदर्शनातील स्टॉलला भेट देऊन पाहणी केली. या वेळी 'मिलेट' जनजागृतीसाठी काढलेल्या दुचाकी फेरीस रावल यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखविण्यात आला.

रावल म्हणाले, ''बदलत्या जीवनशैलीमुळे अनेकांना आरोग्याबाबत अडचणी येत आहेत. लोकांना चांगले अन्न मिळावे यासाठी भारताने २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष साजरे केले. तृणधान्य हे आरोग्याला फायदेशीर असल्यामुळे आपण तृणधान्य महोत्सव आयोजित केला. याचा फायदा शेतकऱ्यांना देखील होत आहे.''

संजय कदम म्हणाले, ''राज्यभरातील आठ विभागांत 'मिलेट' महोत्सव होणार आहे. महोत्सवाच्या माध्यमातून जनजागृती करण्याचा प्रयत्न केला जात आहे.''

सकाळ

# आंतरराष्ट्रीय बाजार समिती उभारणार

## पणनमंत्री जयकुमार रावल; शेतमालाला मिळणार चांगला भाव

**मार्केट यार्ड, ता. ९ :** ''जगभरातील बाजार समित्यांचा अभ्यास करून राज्यातील सर्वांत मोठी आंतरराष्ट्रीय बाजार समिती उभारण्याचा संकल्प केला आहे. मुंबईनजीक महामुंबई मार्केट कमिटी स्थापन करण्याचे नियोजन आहे. या माध्यमातून राज्यातील शेतमाल जगाच्या बाजारात विकला जाईल. त्यामुळे शेतमालाला चांगला भाव मिळेल,'' असा विश्वास पणनमंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केला.

पुण्यात आयोजित 'मीलेट' (तृणधान्य) महोत्सवाच्या उद्घाटनानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. रावल म्हणाले, ''मुंबई, पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या नोडल बाजार समित्या आहेत. या बाजार समित्या ७०-८०च्या दशकात सुरू केलेल्या आहेत. मुंबई बाजार समितीला टर्मिनल मार्केट म्हटले जाते. त्यामुळे मुंबई परिसरात हे मार्केट उभारण्याचे नियोजन आहे. एक ते दीड हजार एकरावर हे मार्केट उभारण्यात येणार आहे. या ठिकाणी रेल्वे, विमान, रस्ते सेवा उपलब्ध असतील.''

यामुळे चालूवर्षीही मिलेट (तृणधान्य) महोत्सवाचे पुण्यामध्ये आयोजन करणेबाबत मा.ना.श्री. जयकुमार रावल, मंत्री, पणन व राजशिष्टाचार, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांनी सुचना दिल्या होत्या, त्यास अनुसरून मिलेट (तृणधान्य) महोत्सव २०२५ चे आयोजन 'श्री गणेश कला क्रिडा रंगमंच' स्वारगेट, पुणे येथे दि.८ ते १२ जानेवारी, २०२५ या कालावधीत करण्यात येणार असुन मिलेट व मिलेटची उत्पादने त्यामध्ये कार्यरत असणाऱ्या शेतकरी उत्पादक संस्था, स्टार्टअपस यांचेसोबत थेट संवाद साधण्यासाठी स्वत मंत्रीमहोदय



दिनांक ९ जानेवारी रोजी महोत्सवास भेट देणार आहेत.

महोत्सवामध्ये राज्याच्या विविध भागातून तृणधान्य उत्पादक, प्रक्रियामध्ये कार्यरत असणारे बचत गट सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टर्ट कंपन्या सहभागी होणार आहेत. या ठिकाणी उत्पादकांना सुमारे स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार असुन ग्राहकांना अस्सल ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्र तृणधान्ये व यापासुन तयार करण्यात येणारा ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडाली मिक्स, रागीचा डोसा मिक्स, ज्वारीचे आईसक्रिम इत्यादी नाविण्यपुर्ण अशी उत्पादने थेट उत्पादकांकडुन प्रव तसेच विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत. या वर्षी पणन मंडळाच्या नागपूर विभागाने काही संत्रा उत्पादकांना सित्कीची संधी देणेबाबत विनंती केलेने काही संत्रा उत्पादकही सहभागी होणार आहेत.

याबरोबरच मिलेट उत्पादन, मुल्यवर्धीत प्रक्रिया उत्पादने, आरोग्यविषयक महत्व विषयी नामांकित मार्गदर्शनासाठी उपस्थिती, खरेदीदार-विक्रेते संमेलन, मिलेटपासून बनविण्यात येणाऱ्या उत्पादनांची प्रात्यक्षिके अशी विविध कार्यक्रमांचे आयोजन या कालावधीत



असणार आहे. त्यामुळे पुण्यातील ग्राहकांनी मिलेट खरेदी, विविध कार्यक्रमाचा लाभ घेण्याबरोबरच नववर्षाची आरोग्यपूर्ण अशा मिलेटने करावी असेआवाहन पणन मंडळामार्फत करण्यात येत आहे.



Maharashtra Times, 07/01/2025

# आठ जानेवारीपासून तृणधान्य महोत्सव

## गणेश कला क्रीडा केंद्रात आयोजन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राज्य कृषी पणन मंडळातर्फे आठ ते १२ जानेवारीदरम्यान तृणधान्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. गणेश कला क्रीडा रंगमंच येथे होणाऱ्या या महोत्सवाचे उद्घाटन पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते नऊ जानेवारी रोजी सकाळी दहा वाजता होणार आहे. या महोत्सवात विविध प्रकारची तृणधान्ये विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत.

'राज्य कृषी पणन मंडळातर्फे उत्पादक ते ग्राहक थेट विक्री या संकल्पनेतून विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थांची संख्या कमी करून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव आणि ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळावा, या उद्देशाने विविध फळ व धान्य महोत्सवांचे आयोजन करण्यात येते. याच संकल्पनेतून तृणधान्य महोत्सव दुसऱ्यांदा आयोजित करण्यात आला आहे,' अशी माहिती मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.

संयुक्त राष्ट्रांनी २०२३मध्ये आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून साजरे केले. तृणधान्य वर्षाची सांगता झालेली असली तरी, उत्पादक तसेच ग्राहकांना तृणधान्यासाठी व्यासपीठ म्हणून महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. महोत्सवामध्ये तृणधान्य उत्पादक, बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या सहभागी होणार आहेत.

गावरान ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्रा ही तृणधान्ये आणि त्यापासून तयार करण्यात येणारा ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली पीठ, रागीचा डोसा पीठ, ज्वारीचे आइस्क्रीम अशी उत्पादने थेट शेतकऱ्यांकडून विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत.

Loksatta, 07/01/2025

# पणन मंडळाच्या वतीने तृणधान्य महोत्सव

## ८ ते १२ जानेवारी कालावधीत आयोजन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने तृणधान्य (मिलेट) महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव ८ जानेवारी (बुधवार) ते १२ जानेवारी (रविवार) या कालावधीत गणेश कला क्रीडा रंगमंच येथे होणार आहे. राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्‌घाटन होणार आहे.

राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी ही माहिती सोमवारी पत्रकार परिषदेत दिली. राज्य कृषी पणन मंडळाकडून 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' ही संकल्पना राबविली जात आहे. त्या माध्यमातून विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थांची संख्या कमी करून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव आणि ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळावा, हा या महोत्सवाचा हेतू आहे. महोत्सवामध्ये राज्याच्या विविध भागांतून तृणधान्य उत्पादक, प्रक्रियांमध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या सहभागी होणार आहेत. महोत्सवातील ५० दालनांमध्ये गावरान ज्वारी, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली पीठ, रागीचा डोसा, ज्वारीचे आईस्क्रीम अशी उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध होणार आहेत, असे कदम यांनी सांगितले.

लोकमत

न्यूज Inbox



# पणन मंडळाकडून तृणधान्य महोत्सव

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने 'मिलेट (तृणधान्य) महोत्सव-२०२५'चे ८ ते १२ जानेवारी या कालावधीत गणेश कला क्रीडा रंगमंच येथे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली. या महोत्सवासाठी राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल उपस्थित राहणार आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाने २०२३ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष' म्हणून साजरे केले गेले. देशभर उपक्रम राबविण्यात आले होते. पणन मंडळामार्फत दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' या संकल्पनेंतर्गत विक्रीमुळे शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव मिळावा, हाही महोत्सवाचा उद्देशही आहे.

Hello Pune
Page No. 1 Jan 07, 2025
Powered by: erelego.com

साप्ताहिक
कात्रजच्या बोगद्यातून
ग्रामीण भागातील वाचकांचे
आवडते साप्ताहिक
२९३/२९२ शनिवार पेठ,
ऐश्वर्या अपार्टमेंट, तांबे बोळ, पुणे ३०
फोन : २४४७१५४३ फॅक्स : २४४९५३०७

विदर्भ, नागपूर, मराठवाडा, मुंबई, ठाणे, नाशिक, कोकण, गोवा, नांदेड, अहिल्यानगर, सातारा, सांगली,
छत्रपती संभाजीनगर, अमरावती, रायगड उर्वरित संपूर्ण महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यातून वितरीत होणारे एकमेव दैनिक

# लोकमान्य सांजवार्ता

आर.एन.आय. नं. ७०१११/१९९९
रजि. नं. पी.सी.डब्ल्यू/००९/२०२४-२०२६

लोकमान्य सांजवार्ता
एक अद्वितीय सायंदैनिक
दररोज वाचा
किंमत १ रुपया, पाने ४
(रविवार सुट्टी)
ज्ञान, विज्ञान, मनोरंजन आणि ताज्या घडामोडींनी भरलेला
दररोज दु. ४ वाजता आपल्या हाती
२९३/२९२ शनिवार पेठ, तांबे बोळ, पुणे -३०
फोन : २४४७१५४३/ २४४९५३०७

वर्ष २५ वे/अंक २८९ वा | Registered | ◆ शहर आवृत्ती/पुणे, मंगळवार, दि. ७ जानेवारी २०२५ (दैनिक) | Posted at S.P. College Post Pune-30 / January 2025 | ● पृष्ठे-४ | ● किंमत एक रुपया

## कृषी पणन मंडळाच्यावतीने ८ ते १२ जानेवारीदरम्यान तृणधान्य महोत्सवाचे आयोजन



**पुणे (दैनिक लोकमान्य सांजवार्ता प्रतिनिधी) :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्यावतीने 'मिलेट (तृणधान्य) महोत्सव-२०२५'चे श्री गणेश कला क्रीडा रंगमंच, स्वारगेट येथे ८ ते १२ जानेवारी २०२५ या कालावधीत आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली आहे. या महोत्सवासाठी राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल उपस्थित राहणार आहेत, असेही त्यांनी सांगितले.

संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०२३ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष' म्हणून साजरे केल्यानुसार देशभर विविध उपक्रम राबविण्यात आले होते. तृणधान्यांमध्ये असलेल्या पोषक तत्वामुळे सामान्य ग्राहक मोठ्या प्रम णात आकर्षित होत आहे. तृणधान्य वर्षाची सांगता झालेली असली तरी, उत्पादक तसेच ग्राहकांना आरोग्याच्या दृष्टिकोनातून फायदेशीर आहे. या दृष्टीकोनासह पणन मंडळामार्फत दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' या संकल्पनेअंतर्गत विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थांची संख्या कमी करून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळावा हा उद्देशही या महोत्सवामागे आहे. यामध्ये मिलेट व मिलेटची उत्पादने, त्यामध्ये कार्यरत असणाऱ्या शेतकरी उत्पादक संस्था, नवोपक्रम (स्टार्टअप्स) यांच्याशी पणन मंत्री श्री. रावल थेट संवाद साधणार आहेत.महोत्सवामध्ये राज्याच्या विविध भागातून तृणधान्य उत्पादक, प्रक्रियामध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्टअप सहभागी होणार आहेत. या ठिकाणी उत्पादकांना सुम रे ५० स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार असून ग्राहकांना अस्सल ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्रा आदी तृणधान्ये व त्यापासून तयार करण्यात येणारी उत्पादने तसेच ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली मिक्स, रागीचा डोसा मिक्स, ज्वारीचे आईसक्रीम आदी नाविण्यपूर्ण उत्पादने थेट उत्पादकांकडून प्रदर्शन व विक्रीसाठी उपलब्ध असतील.

याबरोबरच मिलेट उत्पादन, मूल्यवर्धीत प्रक्रिया उत्पादने, आरोग्यविषयक महत्त्वाबाबत नामांकित तज्ज्ञांचे मार्गदर्शन, खरेदीदार-विक्रेते संमेलन, मिलेटपासून बनविण्यात येणाऱ्या उत्पादनांची प्रात्यक्षिके असतील. याशिवाय नागपूरचे संत्रा उत्पादकही यात सहभागी होणार आहेत. पुण्यातील ग्राहकांनी मिलेट खरेदी, विविध कार्यक्रमाचा लाभ घेण्याबरोबरच नववर्षाची सुरूवात आरोग्यपूर्ण अशा मिलेटने करावी, असे आवाहनही श्री. कदम यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये केले आहे.

Kesari, 07/01/2025

# कृषी पणन मंडळाच्या वतीने ८ ते १२ जानेवारीदरम्यान तृणधान्य महोत्सव

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने मिलेट (तृणधान्य) महोत्सव २०२५ 'श्री गणेश कला क्रीडा रंगमंच' (स्वारगेट) येथे ८ ते १२ जानेवारी २०२५ या कालावधीत आयोजन करण्यात आल्याची माहिती पणन मंडळाचे कार्यकारी अधिकारी संचालक संजय कदम यांनी दिली आहे. या महोत्सवासाठी राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय 'पौष्टिक तृणधान्य' वर्ष म्हणून साजरे केल्यानुसार देशभर विविध उपक्रम राबविण्यात आले आहे. तृणधान्यांमध्ये असलेल्या पोषक तत्त्वांमुळे सामान्य ग्राहक मोठ्या प्रमाणात आकर्षित होत आहेत. तृणधान्य वर्षाची सांगता झालेली असली तरी उत्पादक तसेच ग्राहकांना आरोग्याच्या दृष्टीकोनातून फायदेशीर आहे. या दृष्टीकोनात पणन मंडळाकडून दरवर्षी उत्पादक ते ग्राहक थेट विक्री या संकल्पनेमार्फत मध्यस्थांची संख्या कमी करून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळावा हा उद्देशही या महोत्सवामागे आहे.

यामध्ये मिलेट व मिलेटची उत्पादने, त्यामध्ये कार्यरत असणाऱ्या शेतकरी उत्पादक संस्था नवोपक्रम (स्टार्टअप्स) यांच्याशी पणनमंत्री रावल थेट संवाद साधणार आहेत.

महोत्सवामध्ये राज्याच्या विविध भागांतून तृणधान्य उत्पादक प्रक्रियामध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्टअप सहभागी होणार आहेत. या ठिकाणी उत्पादकांना सुमारे ५० स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

ग्राहकांना अस्सल ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्रा आदि तृणधान्ये व त्यापासून तयार करण्यात येणारी उत्पादने तसेच ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली मिक्स, रागीचा डोसा, मिक्स ज्वारीचे आईसस्क्रीम आदि नाविन्यपूर्ण उत्पादने थेट उत्पादकांकडून प्रदर्शन व विक्रीसाठी उपलब्ध असतील.

याबरोबर मिलेट उत्पादन, मूल्यवर्धित प्रक्रिया उत्पादने, आरोग्यविषयक महत्त्वाबाबत नामांकित तज्ज्ञांचे मार्गदर्शन, खरेदीदार-विक्रेते संमेलन, मिलेटपासून बनविण्यात येणाऱ्या उत्पादनांची प्रात्यक्षिके असतील. याशिवाय नागपूरचे संत्रा उत्पादकही यात सहभागी होणार आहेत. पुण्यातील ग्राहकांनी मिलेट खरेदी विविध उपक्रमांचा लाभ घेण्याबरोबरच नववर्षाची सुरुवात आरोग्यपूर्ण अशा मिलेटने करावी, असेही आवाहन कदम यांनी केले आहे.

Divas Ratri, 07/01/2025

# महाराष्ट्र राज्य कृषि पणन की ओर मिलेट (तृणधान्य) महोत्सव का आयोजन



**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषि पणन बोर्ड 'उत्पादक से उपभोक्ता तक सेल' की अवधारणा के तहत हर साल विभिन्न महत्वपूर्ण कार्यक्रम आयोजित करता है। बिक्री प्रणाली में बिचौलियों की संख्या को कम करने के उद्देश्य से विभिन्न फल और चीनी उत्सव आयोजित किए जाते हैं ताकि किसानों को उचित मूल्य पर अच्छी गुणवत्ता वाली कृषि उपज सही बाजार में मिल सके।

संयुक्त राष्ट्र ने वर्ष २०२३ को अंतर्राष्ट्रीय पौष्टिक अनाज वर्ष' के रूप में मनाया है। इस अवसर पर देश भर में विभिन्न गतिविधियां संचालित की गईं, अनाजों की पौष्टिकता बड़ी संख्या में आम उपभोक्ताओं को आकर्षित कर रही है। इसलिए भले ही अनाज वर्ष समाप्त हो गया है, लेकिन यह उत्पादकों के साथ-साथ उपभोक्ताओं के लिए स्वास्थ्य की दृष्टि से फायदेमंद है। पिछले साल इसी भूमिका से बाजरा महोत्सव की शुरुआत हुई थी और इसे पुणे के लोगों ने खूब सराहा था.

इसके चलते इस वर्ष भी पुणे में बाजरा (अनाज) महोत्सव के आयोजन के संबंध में माननीय श्री. जयकुमार रावल, मंत्री, विपणन और शिष्टाचार, महाराष्ट्र राज्य और अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि विपणन बोर्ड, पुणे ने निर्देश जारी किए, तदनुसार बाजरा (अनाज) महोत्सव २०२५ का आयोजन ८ से १२तारीख को स्वारगेट, पुणे में श्री गणेश कला क्रीड़ा रंगमंच में किया गया है। ऐसी जानकारी पणन मंडळ के कार्यकारी संचालक संजय कदम ने दी। मंत्री स्वयं ९ जनवरी को महोत्सव का दौरा कर बाजरा और बाजरा के उत्पादों, किसान उत्पादक संगठनों और इसमें काम करने वाले स्टार्टअप के साथ सीधे बातचीत करेंगे।

महोत्सव में राज्य के विभिन्न हिस्सों से अनाज उत्पादक, स्वयं सहायता समूह सहकारी समितियां, किसान उत्पादक कंपनियां, स्टार्ट-अप कंपनियां भाग लेंगी। इस स्थान पर उत्पादकों को स्टॉल उपलब्ध कराए जाएंगे और ग्राहक प्रामाणिक ज्वारी, बाजरी, नचणी, भगर, राला, सामा, कोडरा अनाज और ज्वार रवा, बाजरी लाहिया, रागी बिस्कुट, ज्वार इडली मिक्स, रागी डोसा मिक्स खरीद सकेंगे।, बाजरी आइसक्रीम आदि ऐसे नवोन्मेषी उत्पाद विकी के साथ-साथ प्राव के लिए भी सीधे निर्माताओं से उपलब्ध होंगे हैं इस वर्ष कुछ संतरा उत्पादक भी भाग लेंगे क्योंकि विपणन बोर्ड के नागपुर प्रभाग ने कुछ संतरा उत्पादकों को अवसर देने का अनुरोध किया है।

इसके साथ ही इस दौरान बाजरा उत्पादन, मूल्य वर्धित प्रसंस्करण उत्पाद, स्वास्थ्य महत्व पर प्रसिद्ध मार्गदर्शन के लिए उपस्थिति, क्रेता-विक्रेता बैठकें, बाजरा से बने उत्पादों का प्रदर्शन जैसे विभिन्न कार्यक्रम आयोजित किए जाएंगे।

इसलिए, पुणे में उपभोक्ताओं से मार्केटिंग बोर्ड के माध्यम से बाजरा खरीदने, विभिन्न कार्यक्रमों का लाभ उठाने और स्वस्थ बाजरा के साथ नए साल का जश्न मनाने का आग्रह किया जाता है।

Agrowon, 07/01/2025

# मिलेट महोत्सव गुरुवारपासून

अॅग्रोवन वृत्तसेवा

पुणे : तृणधान्याचा वापर आहारात वाढावा यासाठी आणि तृणधान्याची बाजारपेठ विस्तारावी यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने गणेश कला क्रिडा रंगमंच येथे ८ ते १२ जानेवारी दरम्यान मिलेट (तृणधान्य) महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवात तृणधान्याच्या विविध पाककृतींसह विविध पदार्थ चाखता आणि खरेदी करता येणार आहे. यामध्ये विशेषतः ज्वारीचे आइस्क्रीम हे आकर्षण असणार आहे. अशी माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक डॉ. संजय कदम यांनी सोमवारी (ता.६) पत्रकार परिषदेमध्ये दिली. या वेळी मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे उपस्थित होते.

डॉ. कदम म्हणाले, की संयुक्त राष्ट्रसंघाने २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष साजरे केले. यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर तृणधान्याचे आहारातील महत्त्व आणि जनजागृती वाढली आहे.

नागरिकांच्या आहारात तृणधान्याचा वापर वाढावा, या माध्यमातून तृणधान्याची मागणी, लागवड, उत्पादन वाढावे या हेतूने पणन मंडळाच्या वतीने दर वर्षी एकाच वेळी आणि एकाच ठिकाणी या महोत्सवाचे आयोजन करून ब्रॅण्ड विकसित केला जाणार आहे. यासाठी गेल्या वर्षी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये २०० पेक्षा अधिक शेतकरी, प्रक्रियादार, शेतकरी कंपनी, स्टार्टअप या महोत्सवात सहभागी झाले होते. गेल्या वर्षी ३२ लाख रुपयांची उलाढाल झाली होती. यावर्षी ४० लाख रुपयांच्या उलाढाल होण्याचा अंदाज आहे.

## आठ विभागांत होणार महोत्सव

राज्यात पुण्यासह, कोकण (वाशी), नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर, लातूर आणि कोल्हापूर येथे महोत्सवाचे आयोजन केले जाणार आहे.

## एक कोटी ३० लाखांची उलाढाल

गेल्यावर्षी ८ विभागांत घेण्यात आलेल्या महोत्सवात १ कोटी ३० लाखांची उलाढाल झाली होती. यावर्षी २ कोटींच्या उलाढालीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

## गुरुवारी पणन मंत्र्यांच्या हस्ते उद्‍घाटन

महोत्सवाला बुधवारी (ता.८) प्रारंभ होत असला तरी, पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते गुरुवारी (ता.९) महोत्सवाचे उद्घाटन होणार असल्याचे डॉ. कदम यांनी सांगितले.

Samsiddhi
Service Pvt. Ltd.
(SSPL)

# राष्ट्ररुप

समसिध्दी चॅरिटेबल
फाऊंडेशन, पुणे
SDM/SR/PUNE/41
Dt.06/07/2023

RNI No. MAHMAR/2023/ 89884

वर्ष २ ● अंक १३७ ● सायं दैनिक, पुणे सोमवार ६ जानेवारी २०२५ ● पाने : ६ ● किंमत ३ रुपये

# महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळातर्फे कडधान्य महोत्सवाचे आयोजन



पुणे : महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' या संकल्पनेअंतर्गत विविध



महत्वाचे आयोजन करण्यात येते. विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थांची संख्या कमी करून शेतकऱ्यांना योग्य बाजारचा ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवतेचा शेतमाल मिळावा या उद्देशाने विविध फळ व धान्य महोत्सवांचे आयोजन करण्यात येते.

संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०२३ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष' म्हणून साजरे केले. या निमित्ताने देशभर विविध उपक्रम राबविण्यात आले, तृणधान्यांमध्ये असलेल्या पोषक तत्वामुळे सामान्य ग्राहक मोठ्या प्रमाणात आकर्षित होत आहे. त्यामुळे भलेही तृणधान्य वर्षाची सांगता झालेली असली तरी, उत्पादक तसेच ग्राहकांना आरोग्याच्या दृष्टिकोनातून फायदेशीर आहे. या भूमिकेतून गतवर्षी मिलेट महोत्सवाची सुरूवात करण्यात आली व त्याला पुणेकरांनी चांगला प्रतिसाद दिला.

यामुळे चालूवर्षीही मिलेट (तृणधान्य) महोत्सवाचे पुण्यामध्ये आयोजन करणेबाबत मा.ना.श्री. जयकुमार रावल, मंत्री, पणन व राजशिष्टाचार, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांनी सुचना दिल्या होत्या, त्यास अनुसरून मिलेट (तृणधान्य) महोत्सव २०२५ चे आयोजन 'श्री गणेश कला क्रिडा रंगमंच' स्वारगेट, पुणे येथे दि.८ ते १२ जानेवारी, २०२५ या कालावधीत



करण्यात येणार असुन मिलेट व मिलेटची उत्पादने त्यामध्ये कार्यरत असणाऱ्या शेतकरी उत्पादक संस्था, स्टार्टअपस



यांचेसोबत थेट संवाद साधण्यासाठी स्वत मंत्रीमहोदय दिनांक ९ जानेवारी रोजी महोत्सवास भेट देणार आहेत.

महोत्सवामध्ये राज्याच्या विविध भागातून तृणधान्य उत्पादक, प्रक्रियामध्ये कार्यरत असणारे बचत गट सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टर्ट कंपन्या सहभागी होणार आहेत. या ठिकाणी उत्पादकांना सुमारे स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार असुन ग्राहकांना अस्सल ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्र तृणधान्ये व यापासुन तयार करण्यात येणारा ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली मिक्स, रागीचा डोसा मिक्स, ज्वारीचे आईसक्रिम इत्यादी नाविण्यपुर्ण अशी उत्पादने थेट उत्पादकांकडुन प्रत्र तसेच विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत. या वर्षी पणन मंडळाच्या नागपूर विभागाने काही संत्रा उत्पादकांना सित्क्रीची संधी देणेबाबत विनंती केलेने काही संत्रा उत्पादकही सहभागी होणार आहेत.

याबरोबरच मिलेट उत्पादन, मुल्यवर्धीत प्रक्रिया उत्पादने, आरोग्यविषयक महत्व विषयी नामांकित मार्गदर्शनासाठी उपस्थिती, खरेदीदार-विक्रेते संमेलन, मिलेटपासून बनविण्यात येणाऱ्या उत्पादनांची प्रात्यक्षिके अशी विविध कार्यक्रमांचे आयोजन या काल-



वधीत असणार आहे. त्यामुळे पुण्यातील ग्राहकांनी मिलेट खरेदी, विविध



कार्यक्रमाचा लाभ घेण्याबरोबरच नववर्षाची आरोग्यपूर्ण अशा मिलेटने करावी असेआवाहन पणन मंडळामार्फत करण्यात येत आहे.

Agrowon, 04/01/2025

# सांगलीतून द्राक्ष निर्यातीस प्रारंभ

## निर्यातीसाठी ८ हजार ८३९ शेतकऱ्यांची नोंदणी

**अॅग्रोवन वृत्तसेवा**



सांगली : या वर्षी द्राक्ष शेतीसमोर अखंड अस्मानी संकट ओढवले. अशा परिस्थितीतही जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांनी निर्यातीसाठी पुढाकार घेतला आहे. ८ हजार ८३९ शेतकऱ्यांनी निर्यातीसाठी नोंदणी केली आहे. जिल्ह्यातून गोड रसाळ द्राक्षांच्या निर्यातीला सुरुवात झाली असून, सौदी अरेबिया आणि दुबई या देशांमध्ये नऊ कंटेनरमधून १७२ टन द्राक्ष निर्यातीचा श्रीगणेशा झाला आहे.

जिल्ह्यात यंदाच्या सप्टेंबर ते ऑक्टोबरअखेर पाऊस सुरू होता. यामुळे फळ छाटणी लांबणीवर पडली. गोडी छाटणी घेतलेल्या बागांचे नुकसान झाले. बदलत्या वातावरणाचाही द्राक्ष बागेला फटका बसला. अशा परिस्थितीतही जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादक शेतकरी निर्यातीसाठी पुढे आले आहेत. जिल्ह्यातून हंगामात द्राक्ष निर्यातीसाठी शेतकऱ्यांची नोंदणी अधिक होण्यासाठी कृषी विभागाने पुढाकार घेतला आहे. जिल्ह्यातील ८ हजार ८३९ शेतकऱ्यांकडून चार हजार ७९७ हेक्टर क्षेत्राची निर्यात द्राक्षांसाठी नोंदणी झाली.

जिल्ह्यातून २०२२-२३ या वर्षात युरोपियन देशात ८२५ कंटेनरमधून ९ हजार ७०२ टन तर आखाती देशात ४८९ कंटेनरने ७ हजार ६१५ टन अशी एकूण १७ हजार ९३७ टन द्राक्षे निर्यात झाली होती. त्यातून १८० कोटींहून अधिकचे परकीय चलन देशाला मिळाले. २०२३-२४ या वर्षात ८३४ टनांनी द्राक्ष निर्यात वाढून १८ हजार ७७१ टन द्राक्षाची निर्यात झाली होती. त्यातून १८७ कोटींचे परकीय चलन मिळाले होते. २०२४-२५ या वर्षात आठ हजार ८३९ हजार शेतकऱ्यांनी चार हजार ७९७ हेक्टर क्षेत्राची नोंदणी केली आहे. दुबई आणि सौदी अरेबियाला निर्यात सुरू झाली असून पहिल्या नऊ कंटेनरमधून १२७ टन द्राक्षांची निर्यात झाली आहे. सर्वाधिक निर्यात द्राक्षाचे क्षेत्र मिरज तालुक्यात एक हजार ४७४ हेक्टर असून त्यानंतर १३९७ हेक्टरसह जतचा नंबर लागतो.

### निर्यात द्राक्षांसाठी नोंदणी

| तालुका | शेतकरी संख्या | क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|
| मिरज | २६३५ | १४७५ |
| वाळवा | १४७ | ७१ |
| तासगाव | १४८९ | ७७१ |
| खानापूर | ९४० | ४८२ |
| पलूस | २१० | १०५ |
| कडेगाव | २५ | १४ |
| आटपाडी | १२३ | ७३ |
| जत | २१३२ | १२९७ |
| कवठेमहाकाळ | ११३८ | ५०८ |

Pudhari, 03/01/2025



पणनमंत्री जयकुमार रावल (डावीकडे) यांना डाळिंब निर्यातीबाबतची माहिती देताना पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे.

# अमेरिका-चीनमधील कृषिमालाच्या मार्केटिंगची माहिती घ्या

- पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या अधिकाऱ्यांना सूचना
- वाशीतील निर्यात सुविधा केंद्राला भेट देऊन केली कामकाजाची पाहणी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

जगातील पाचवी अर्थव्यवस्था म्हणून भारत सध्या कार्यरत आहे. त्यामुळे आपल्यापेक्षा विकसित असलेल्या अमेरिका व चीन या देशांमध्ये कृषिमालाचे मार्केटिंग कशा पद्धतीने केले जाते, याबाबतची माहिती प्राप्त करून घेण्याच्या महत्त्वपूर्ण सूचना राज्याचे पणन व राजशिष्टाचारमंत्री तसेच पणन मंडळाचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. ज्यामुळे देशाची कृषिमाल निर्यात वाढविण्यास फायदा होईल, असे ते म्हणाले.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन महामंडळ येथील निर्यात सुविधा केंद्राला त्यांनी सोमवारी (दि. ३०) भेट दिली. तेथील निर्यातीच्या सुरू असलेल्या कामकाजाची पाहणी केली आणि अधिकाऱ्यांसमवेत चर्चा केल्यानंतर समाधान व्यक्त केले.

या वेळी कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांच्यासह सुविधा केंद्रांवर काम करणारे अधिकारी उपस्थित होते. कृषी पणन मंडळाच्या अमेरिका, ऑस्ट्रेलिया, युरोपियन देश, जपान, न्यूझीलंड, मलेशिया, दक्षिण कोरिया आदी देशांना कृषिमाल निर्यात करण्याकरिता आवश्यक असलेल्या वाशी येथील विकिरण सुविधा केंद्र, उष्ण बाष्प प्रक्रिया केंद्र व भाजीपाला प्रक्रिया केंद्र याबाबतीतील संपूर्ण माहिती या वेळी पणनमंत्र्यांना देण्यात आली.

अतिदूरवरच्या देशांना समुद्रमार्गे कृषिमाल निर्यात करण्यासंदर्भात प्रोटोकॉल विकसित करण्यात आला असून, रशियातील केळी निर्यातीच्या चाचणीसाठी प्रथमच माल पाठविण्यात आला आहे. ही केळी निर्यात यशस्वीरीत्या रशियामध्ये पोहोचल्याची माहिती कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी दिली.

## मुंबईत कृषिमाल निर्यातदारांची होणार कार्यशाळा

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ व मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संयुक्त विद्यमाने फेब्रुवारी २०२५ च्या सुमारास विविध कृषिमालांचे निर्यातदार व संबंधित घटकांची एकदिवसीय कार्यशाळा मुंबईत आयोजित करण्याच्या सूचना पण मंत्र्यांनी दिल्या. या बैठकीवेळी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक, आमदार शशिकांत शिंदे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक आणि कृषी उत्पन्न बाजार समिती मुंबईचे सचिव डॉ. पी. एल. खंडागळे आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

Agrowon, 03/01/2025

# निर्यातीचे नियम निश्चित करा : मंत्री रावल

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : शेतीमालाच्या निर्यातवाढीसाठी विविध देशांच्या शेतीमालाचे उत्पादन आणि निर्यातीचा अभ्यास करा, तसेच निर्यातीचा खर्च कमी करण्यासाठी समुद्रमार्गे निर्यातीचे नियम निश्चित करा, अशा सूचना पणनमंत्री जयकुमार रावल यांनी पणन मंडळाच्या अधिकाऱ्यांना दिल्या

मंत्री रावल यांनी पणन मंडळाच्या वाशी येथील निर्यात सुविधा केंद्राची पाहणी केली. या वेळी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक आमदार शशिकांत शिंदे, पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे, बाजार समितीचे सभापती अशोक डक, सचिव डॉ. पी. एल. खंडागळे व इतर अधिकारी उपस्थित होते.

या वेळी पणन मंडळाच्या निर्यात सुविधा केंद्रावरून, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, युरोपियन देश, जपान, न्युझीलंड, मलेशिया, दक्षिण कोरिया आदी देशांना निर्यात करण्याकरिता वापरण्यात येणाऱ्या उष्णबाष्प प्रक्रिया केंद्र व भाजीपाला प्रक्रिया केंद्र याबाबाबचे सादरीकरण केले.

या वेळी मंत्री रावल म्हणाले, की विकसित देशांची निर्यात कशा पद्धतीने वाढवता येईल यासाठी पणन मंडळाने कार्यप्रणाली तयार करावी. देश सध्या जगातील पाचवी अर्थव्यवस्था म्हणून कार्यरत आहे. त्यामुळे आपल्याला आपल्यापेक्षा विकसित अमेरिका व चीन या देशांमध्ये कृषीमालाचे विपणन आणि निर्यात कशा पद्धतीने केली जाते. याबाबतची माहिती तयार करण्याच्या सूचना केल्या. तसेच चीनमधील शेतीमालाचे लागवडीखालील क्षेत्र हे भारताच्या लागवडीखाली क्षेत्राच्या तीन पट असून तेथे उत्पादित कृषिमालाचे विपणन आणि निर्यात कशा पद्धतीत केले जाते याबाबत देखील अभ्यास करावा अशा सूचना केल्या.

या वेळी कोकरे यांनी भारतापासून अतिदूरवरच्या देशांना समुद्रमार्गे कृषिमाल निर्यात करण्यासंदर्भात प्रोटोकॉल विकसित करण्यात आले असून रशिया येथे केळीची चाचणी कन्साईनमेंट पाठवण्यात आली व सदर कन्साईनमेंट यशस्वीरित्या रशिया येथे पोहोचली आहे अशी माहिती दिली.



**नवी मुंबई : राज्य कृषी पणन मंडळाच्या वाशी येथील निर्यात सुविधा केंद्राची पणनमंत्री जयकुमार रावल यांनी भेट देऊन पाहणी केली. या वेळी मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी डाळिंब, सीताफळ निर्यात प्रक्रियेची माहिती दिली.**

## फेब्रुवारीमध्ये निर्यात परिषद

पणन मंडळ, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या वतीने फेब्रुवारीमध्ये कृषिमालाचे निर्यातदार व संबंधित घटकांची एकदिवसीय कार्यशाळा मुंबई येथे आयोजित करण्याच्या सूचना मंत्री जयकुमार रावल यांनी केल्या.

१४
पुण्य नगरी
| गुरुवार, २ जानेवारी २०२५ | पुणे
घराघरात... मनामनात...

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प

। नवी दिल्ली : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांसह अनेक नेत्यांनी बुधवारी देशवासीयांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. राष्ट्रपती मुर्मू यांनी सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा देताना २०२५ हे वर्ष सर्वांसाठी आनंद, सद्भाव व

# विकसित देशांत कृषी मालाची निर्यात वाढवा !

## पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या सूचना

**। नवी मुंबई** : भारत सध्या जगातील पाचवी अर्थव्यवस्था म्हणून कार्यरत आहे. त्यामुळे आपल्याला आपल्यापेक्षा विकसित अमेरिका व चीन या देशांमध्ये कृषीमालाचे मार्केटिंग कशा पद्धतीने केले जाते, याबाबतची माहिती प्राप्त करून घ्यावी. तसेच विकसित देशांची निर्यात कशा पद्धतीने वाढवता येईल, याचा अभ्यास करावा, अशा सूचना पणन मंत्री जयकुमार रावल यांनी नवी मुंबईतील महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाला दिल्या. पणन मंत्री जयकुमार रावल यांनी नवी मुंबईतील महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाला भेट दिली, यावेळी ते बोलत होते.

जयकुमार रावल यांनी ३० नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वाशी येथील सुविधांना भेट दिली. यावेळी मंत्री रावल यांनी सुविधेवर सुरू असलेले कामकाज याबाबतीत अधिकाऱ्यांसमवेत चर्चा केली.

कृषी पणन मंडळाच्या अमेरिका, ऑस्ट्रेलिया, युरोपीअन देश, जपान, न्यूझीलंड, मलेशिया, द. कोरिया इत्यादी देशांना कृषीमाल निर्यात करण्यासाठी आवश्यक असलेल्या वाशी येथील विक्री सुविधा केंद्र, उष्ण बाष्प प्रक्रिया केंद्र व भाजीपाला प्रक्रिया केंद्र



याबाबतीतील संपूर्ण माहिती यावेळी रावल यांना सांगण्यात आली. त्यावर चीनमधील कृषीमालाच्या लागवडीखालील क्षेत्र हे भारताच्या लागवडीखाली क्षेत्राच्या तीन पट असून तेथे उत्पादित कृषीमालाचे मार्केटिंग कशा पद्धतीत केले जाते, याबाबत देखील अभ्यास करावा, अशा सूचना रावल यांनी केल्या. तसेच अतिदूरच्या देशांना समुद्रमार्गे कृषीमाल निर्यात करण्यासंदर्भात प्रोटोकॉल विकसित करण्यात आला असून रशिया येथे केळीची चाचणी कन्साईन्मेंट पाठवण्यात आली व ती यशस्वीरीत्या रशिया येथे पोहोचली आहे, अशी माहिती कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी जयकुमार रावल यांना दिली. त्यानंतर आपल्याला यापेक्षा देखील चांगल्या पद्धतीने कामकाज पुढे नेता येईल, याबाबत विचारविनिमय करण्याबाबत रावल यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना सूचित केले. यावेळी येथील सुविधांवर काम करत असलेले अधिकारी तसेच मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक शशिकांत शिंदे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

पुण्य नगरी
पुणे ग्रामीण

# चीनच्या कृषिमालाच्या मार्केटिंगचा अभ्यास करा

## ■ पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या सूचना



**। पुणे : प्रतिनिधी**

चीनमधील कृषिमालाच्या लागवडीखालील क्षेत्र हे भारताच्या लागवडीखाली क्षेत्राच्या तीन पट असून, तेथे उत्पादित कृषिमालाचे मार्केटिंग कशा पद्धतीत केले जाते याबाबत अभ्यास करा, अशा सूचना राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी केल्या.

मंत्री जयकुमार रावल यांनी कृषी पणन मंडळाच्या वाशी येथील सुविधांना दिली भेट दिली. या वेळी त्यांनी अधिकाऱ्यांची बैठक घेत विविध सुविधेवर सुरू असलेले कामकाज याबाबतीत अधिकाऱ्यांशी चर्चा केली. या वेळी कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे व सुविधेवर काम करीत असलेले अधिकारी उपस्थित होते. कृषी पणन मंडळाच्या अमेरिका, ऑस्ट्रेलिया, युरोपीयन देश, जपान, न्यूझीलंड, मलेशिया, द. कोरिया इ. देशांना कृषिमाल निर्यात करण्याकरिता आवश्यक असलेल्या वाशी येथील विकिरण सुविधा केंद्र, उष्ण बाष्प प्रक्रिया केंद्र व भाजीपाला प्रक्रिया केंद्र याबाबतीतील संपूर्ण माहिती रावल यांना देण्यात आली. पणन मंडळाच्या सुरू असलेल्या कामकाजाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.

विकसित देशांची निर्यात कशा पद्धतीने वाढवता येईल, याबाबत देखील चर्चा केली. भारत सध्या जगातील पाचवी अर्थव्यवस्था म्हणून कार्यरत आहे. त्यामुळे आपल्याला आपल्यापेक्षा विकसित अमेरिका व चीन या देशांमध्ये कृषिमालाचे मार्केटिंग कशा पद्धतीने केले जाते, याबाबतची माहिती प्राप्त करून घेण्यासाठी अधिकाऱ्यांना सूचना करण्यात आल्या. अतिदूरवरच्या देशांना समुद्रमार्गे कृषिमाल निर्यात करण्यासंदर्भात प्रोटोकॉल विकसित करण्यात आला असून, रशिया येथे केळीची चाचणी कन्साईनमेंट पाठविण्यात आली व कन्साईनमेंट यशस्वीरीत्या रशिया येथे पोहोचली आहे, अशी माहिती कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी दिली. आपल्याला यापेक्षा देखील चांगल्या पद्धतीने कामकाज पुढे नेता येईल, याबाबत चर्चा करण्यात आली.

याप्रसंगी बैठकीवेळी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक शशिकांत शिंदे, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक आणि कृषी उत्पन्न बाजार समिती मुंबईचे सचिव डॉ. पी. एल. खंडागळे व इतर अधिकारी उपस्थित होते.

Lokmat, 02/01/2025

# सांगलीतून द्राक्षाचे नऊ कंटेनर दुबईला

## ५४०० हेक्टरवर निर्यात द्राक्षांची नोंदणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**सांगली :** निर्यातक्षम द्राक्ष म्हणून जगभरात ओळख असलेल्या जिल्ह्यातून गोड रसाळ द्राक्षांच्या निर्यातीला सुरुवात झाली असून सौदी अरेबिया आणि दुबई या देशांमध्ये नऊ कंटेनरमधून १७२ मेट्रिक टन द्राक्ष निर्यातीचा श्रीगणेशा झाला आहे. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण चवीने जगाला भुरळ घालणाऱ्या सांगलीच्या द्राक्ष हंगामाला सुरुवात झाली आहे. नऊ हजार शेतकऱ्यांकडून पाच हजार ४०० हेक्टर क्षेत्राची निर्यात द्राक्षांसाठी नोंदणी झाली आहे.

द्राक्ष हे देशाला मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळवून देणारे फळ आहे. २०२२-२३ या वर्षात जिल्ह्यातून युरोपियन देशात ८२५ कंटेनरमधून ९ हजार ७०२ टन, तर आखाती देशात ४८९ कंटेनरने ७ हजार ६१५ टन अशी एकूण १७ हजार ९३७ टन द्राक्षे निर्यात झाली होती. त्यातून १८० कोटींहून अधिकचे परकीय चलन देशाला मिळाले.

२०२३-२४ या वर्षात ८३४ टनाने द्राक्ष निर्यात वाढून १८ हजार ७७१ टन द्राक्षाची जिल्ह्यातून निर्यात झाली होती. त्यातून जिल्ह्याला १८७ कोटींचे परकीय चलन मिळाले होते. २०२४-२५ या वर्षात जिल्ह्यातून

### पेटीला ४०० रुपयांवर दर

सांगली जिल्ह्यातील द्राक्ष हंगाम आता सुरु झाला आहे. ४०० रुपये ते ४८० रुपये पेटी (प्रति ४ किलो) असा दर मिळाला आहे, अशी माहिती द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांनी दिली. जिल्ह्यातील २० ते २५ टक्के बागा डिसेंबर व जानेवारी महिन्यात काढणीला येतील, असेही द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांनी सांगितले.

### द्राक्ष निर्यातीत मिरज, जत तालुक्यांची आघाडी

जिल्ह्यातून सर्वाधिक निर्यात द्राक्षाचे क्षेत्र मिरज तालुक्यात एक हजार ४७४ हेक्टर असून त्यानंतर एक हजार ३९७ हेक्टरसह जत तालुक्याचा नंबर लागत आहे. दुष्काळी तालुका अशी ओळख असलेल्या जत तालुक्याने द्राक्ष निर्यातीत आघाडी घेतल्याचे दिसत आहे.


---

नऊ हजारांवर शेतकऱ्यांनी पाच हजार ४०० हेक्टर क्षेत्राची द्राक्ष निर्यातीसाठी कृषी विभागाकडे नोंदणी केली आहे. दुबई आणि सौदी अरेबियाला निर्यात सुरू झाली असून, पहिल्या नऊ कंटेनरमधून १२७ टन द्राक्षांची निर्यात झाली आहे.

Punyanagari, 01/01/2025

# सोयाबीन खरेदी नोंदणीसाठी ६ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

## पणन मंत्री जयकुमार रावल यांची घोषणा



**मुंबई :** राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्याकरता सोयाबीन खरेदीसाठी नोंदणी करण्यास ६ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आल्याची घोषणा पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केली.

पदभार स्वीकारल्यानंतर पणनमंत्री जयकुमार रावल यांनी विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. विभागाचे कामकाज गतीने करण्यासाठी या बैठकीत विविध निर्णय घेण्यात आले. बैठकीस पणन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, पणन संचालक विकास रसाळ, उपसचिव संतोष देशमुख आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पणन मंत्री रावल म्हणाले की, सोयाबीन उत्पादक शेतकरी, लोकप्रतिनिधी यांची मागणी लक्षात घेता सोयाबीन खरेदी नोंदणीची मुदत सात दिवसांनी म्हणजेच ६ जानेवारी २०२५ पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वीच्या निर्णयानुसार ही मुदत ३१ डिसेंबरपर्यंत होती. तसेच नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी नाफेड आणि एनसीसीएफ यांच्यामार्फत १२ जानेवारीपर्यंत केली जाणार आहे, अशी माहिती देखील मंत्री रावल यांनी दिली. पणनमंत्री रावल म्हणाले की, किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत राज्यात सोयाबीनची खरेदी ४ हजार ८९२ रुपये प्रति क्विंटल या हमीभावाने सुरू आहे. आतापर्यंत सोयाबीनची ३ लाख ३४ हजार ३३१ मेट्रिक टन एवढी विक्रमी खरेदी झाली आहे. मागील वर्षी केवळ ७ हजार ४०० क्विंटल एवढी खरेदी झाली होती. यावर्षी शेतकऱ्यांना एक हजार कोटी रुपये मोबदला देण्यात आला आहे. राज्यात सध्या ५६१ खरेदी केंद्र सुरू असून आतापर्यंत ६ लाख ६९ हजार शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे.

▮ राज्यात शीतगृहांची उभारणी, गोदामांची निर्मिती, गाव तेथे गोदाम, माथाडी कामगार कायदा, शेतमालांची आयात-निर्यात, बाजार समित्यांना मिळणारा सेस, राज्यातील पीक पद्धती, दांगट समितीचा अहवाल, बाजार समिती सभापतींची परिषद यासारख्या बाबींचाही पणन मंत्री रावल यांनी यावेळी आढावा घेतला.

शेतकऱ्यांना हमी भाव, तर ग्राहकांना रास्त दरात माल मिळाला पाहिजे, यासाठी विभागाच्या माध्यमातून यापुढे प्रयत्न करण्यात येणार आहेत. त्यासाठी प्रत्येक तालुक्यात एक बाजार समिती असली पाहिजे, यासाठी प्रयत्न केला जाईल. त्याअंतर्गत आदिवासी भागातील तालुक्यांवर भर देण्यात येईल, या भागात शेतमालाची खरेदी-विक्री करण्यासाठी व्यापाऱ्यांना प्रोत्साहित केले जाईल, अशी माहिती मंत्री रावल यांनी दिली.

▮ पणन विभागामार्फत शेतकरी हिताचे धोरण आखण्यात येणार आहे. सोयाबीन, धान, कापूस यासारख्या पिकांना हमीभाव मिळवून देण्यासह कांद्यासारख्या नाशवंत पिकांना रास्त भाव मिळण्यासाठी पुढाकार घेण्यात येईल. त्यासाठी जगातील उत्तम बाजार व्यवस्थेचा अभ्यास करून तेथील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा आपल्या राज्यात वापर करण्यात येणार आहे. बाजार समित्यांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे वर्गीकरण करण्यासह त्यांचे बळकटीकरण केले जाईल, अशी ग्वाही मंत्री रावल यांनी दिली. नवी मुंबई येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचा कायापालट केला जाणार आहे. आशियातील अग्रेसर बाजार समिती म्हणून तिचा लौकिक होण्यासाठी जगातील उत्तमोत्तम व्यवस्था याठिकाणी राबवण्यात येणार आहे. शेतकरी, हमाल, मापारी, व्यापारी यासारख्या सर्व संबंधित घटकांचा विचार केला जाणार आहे, असा मानस देखील त्यांनी यावेळी व्यक्त केला.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# अमेरिका, चीन देशांतील कृषिमालाच्या मार्केटिंगवर नजर

## पणन मंत्री जयकुमार रावल; निर्यातवाढीसाठी उपाययोजना

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

जगातील पाचवी अर्थव्यवस्था म्हणून भारत सध्या कार्यरत आहे. त्यामुळे आपल्यापेक्षा विकसित असलेल्या अमेरिका व चीन या देशांमध्ये कृषिमालांचे मार्केटिंग कशा पद्धतीने केले जाते, याबाबतची माहिती प्राप्त करून घेण्याच्या महत्त्वपूर्ण सूचना राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तसेच पणन मंडळाचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. ज्यामुळे देशाची कृषिमाल निर्यात वाढविण्यास फायदा होईल, असे ते म्हणाले. महाराष्ट्र राज्य कृषी पणनी येथील निर्यात सुविधा केंद्रास त्यांनी सोमवारी (दि.३०) भेट दिली. तेथील निर्यातीच्या सुरू असलेल्या कामकाजाची पाहणी केली आणि अधिकाऱ्यांसमवेत चर्चा केल्यानंतर समाधान व्यक्त केले. यावेळी कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांच्यासह सुविधा केंद्रांवर काम करणारे अधिकारी उपस्थित होते. कृषी पणन मंडळाच्या अमेरिका, ऑस्ट्रेलिया, युरोपियन देश, जपान, न्यूझीलंड, मलेशिया, दक्षिण कोरिया आदी देशांना कृषिमाल निर्यात करण्याकरीता आवश्यक असलेल्या वाशी येथील विकिरण सुविधा केंद्र, उष्ण बाष्प प्रक्रिया केंद्र व भाजीपाला प्रक्रिया केंद्र या बाबतीतील संपूर्ण माहिती या वेळी पणन मंत्र्यांना देण्यात आली.

अतिदूरवरच्या देशांना समुद्रमार्गे कृषिमाल निर्यात करण्यासंदर्भात प्रोटोकॉल विकसित करण्यात आला असून रशिया येथे केळी निर्यातीच्या चाचणीसाठी प्रथमच माल पाठविण्यात आला आहे. ही केळी निर्यात यशस्वीरीत्या रशिया येथे पोहोचली असल्याची माहिती कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी दिली.



**पुणे : पणन मंत्री जयकुमार रावल (डावीकडे) यांना डाळिंब निर्यातीबाबतची माहिती देताना पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे.**

### मुंबईत कृषिमाल निर्यातदारांची होणार कार्यशाळा

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संयुक्त विद्यमाने फेब्रुवारी २०२५ च्या सुमारास विविध कृषिमालांचे निर्यातदार व संबंधित घटकांची एकदिवसीय कार्यशाळा मुंबईत आयोजित करण्याच्या सूचना पणन मंत्र्यांनी यावेळी दिल्या.